# प्रकरण पाचवे
# माहितीचे विश्लेषण
# व
# अर्थनिर्वचन

# प्रकरण पाचवे


5.01 प्रास्ताविक

5.02 प्रतिसादक मुख्याध्यापकांची माहिती

5.03 प्राथमिक शाळेविषयी सर्वसाधारण माहिती

5.04 कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर

5.05 शिक्षकाविषयी

5.06 विद्यार्थ्यांविषयी

5.07 भौतिकसुविधा व शालेय परिसर

5.08 मुख्याध्यापकांनी प्रशासनाच्या संदर्भात दिलेली इतर माहिती

5.09 केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण

5.10 शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण

5.11 गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण

5.12 प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण

5.13 समारोप.

# प्रकरण पाचवे

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

मुख्याध्यापकांच्या प्रश्नावल्या,केंद्रप्रमुख,शिक्षणविस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखती,प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व प्राथमिक शाळांची केलेली निरीक्षणे

5.01 **प्रास्ताविक**

पहिल्या चार प्रकरणामध्ये संशोधकाने प्राथमिक शाळांच्या प्रशासनाच्या तात्विक भागाचाच विचार केला आहे. मागील प्रकरणांचा उपयोग ह्या संशोधनाची पार्श्वभूमी तयार करणे हा असून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनकरणे हे प्रस्तुत प्रकरणाचे उद्दिष्ट आहे.

प्राथमिक शाळांच्या प्रशासनाच्या दृष्टीने मुख्याध्यापक हे प्रमुख प्रशासक असल्याने संशोधकाने त्यांची संशोधनासाठी निवड केली.मुख्याध्यापकासाठी प्रश्नावली तयार केली,मुख्याध्यापकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीचा नमूना परिशिष्ट ''अ'' मध्ये दिला आहे.संशोधकाने उस्मानाबाद तालुक्यातील सर्वच एकशेतोस प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची संशोधनासाठी निवड केली.परंतू त्यातील 78 मुख्याध्यापकांनीच त्याला प्रतिसाद दिला. प्रतिसादक मुख्याध्यापकांची यादी परिशिष्ट ''ब'' मध्ये देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे संशोधकाने उस्मानाबाद तालुक्यातील 14 केंद्रप्रमुख व 7 केंद्रप्रमुख अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या.त्यांच्यासाठी प्राथमिक शाळांच्या प्रशासनाच्या संदर्भात मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार केली.केंद्रप्रमुख व शिक्षणविस्तार अधिकारी यांच्याशी समक्ष चर्चा करून मुलाखती घेतल्या.केंद्रप्रमुखांसाठी तयार करण्यात आलेल्या मुलाखतीच्या प्रश्नसूचीचा नमुना परिशिष्ट '' क '' मध्ये देण्यात आलेला आहे.शिक्षणविस्तार अधिकारी यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या मुलाखतीच्या प्रश्नसूचीचा नमूना परिशिष्ट '' ड '' मध्ये देण्यात आलेला आहे. उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाचा प्रशासक प्रमुख म्हणून गटशिक्षणाधिकारी यांची मुलाखत घेतली.

गटशिक्षणाधिकारी यांच्यासाठी प्राथमिक शिक्षणासंदर्भात मुलाखतीसाठी प्रश्नसुची तयार करण्यात

आली.गटशिक्षणाधिकाऱ्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नसूचीचा नमुना परिशिष्ट ''ई'' मध्ये देण्यात आला आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांची मुलाखत घेतली.त्यांच्या मतांची नोंद करण्यात आली.

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या केंद्रप्रमुखांची यादी परिशिष्ट "फ" मध्ये व शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षण अधिकारी यांची यादी परिशिष्ट "ग" मध्ये देण्यात आली आहे.

अभ्यासकाने उस्मानाबाद तालुक्यातील दहा प्राथमिक शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व त्या शाळांचे निरीक्षण केले. प्रत्यक्ष भेटीमध्ये इमारत, वर्ग खोल्या, शैक्षणिक साधने, फर्निचर, शालेय वातावरण या विषयी निरीक्षण केले. या निरीक्षणातून प्रत्यक्ष माहिती मिळविली. भेटी दिलेल्या प्राथमिक शाळांची यादी परिशिष्ट "ह" मध्ये देण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीतून माहिती संकलित करण्यात आली. केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षण अधिकारी यांच्या मुलाखती घेतल्या. यासर्वांच्या प्रतिसादावरुन मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विशदीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले.

**5.02 प्रतिसादक मुख्याध्यापकांची माहिती :-**

प्रश्नावलीच्या पहिल्या भागात मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहितीच्या संदर्भात प्रश्न विचारले होते. [ प्रश्न क्र.1] पूर्ण नाव, [ प्रश्न क्र. 2] शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता [ प्रश्न क्र.3] मुख्याध्यापक पद –प्रभारी / कायम, [प्रश्न क्र. 3] मुख्याध्यापक पदाचा अनुभव. प्रश्नावलीच्या या प्रश्नांच्या आधारे प्राप्त झालेली माहिती येथे दिलेली असून, हे प्रश्न प्रतीसादक मुख्याध्यापकांची व्यक्तिगत माहिती दर्शवितात. उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची यादी परिशिष्ट " ब " मध्ये देण्यात आली आहे.

खालील कोष्टक क्रमांक 5.01 मध्ये प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांकडून भरुन आलेल्या प्रश्नावलीच्या आधारे शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता दाखविलेली आहे.

कोष्टकाशी सुसंगती साधण्यासाठी सर्व आलेख
उलटे लवले आहेत.

### कोष्टक क्रमांक 5.01

### मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | एस एस. सी. | 01 | 1.28 |
| 02 | एस. एस. सी. ज्यु. ट्रेड. | 01 | 1.28 |
| 03 | एस. एस. सी. सि. ट्रेंड | 03 | 3.85 |
| 04 | एस. एस. सी. ज्यु. पी. टी. सी. | 18 | 23.08 |
| 05 | सातवी ज्यु. ट्रेंड | 01 | 1.28 |
| 06 | पी. एस. सी. ज्यु. ट्रेंड. | 03 | 3.85 |
| 07 | एस. एस. सी. डी. एड्. | 37 | 47.43 |
| 08 | एच. एस. सी. डी. एड्. | 05 | 6.41 |
| 09 | बी. ए. डि. एड्. | 03 | 3.85 |
| 10 | बी. कॉम. बी. पी. एड्. | 01 | 1.28 |
| 11 | बी. ए. बी. एड्. | 03 | 3.85 |
| 12 | एम. ए. बी. एड्. | 01 | 1.28 |
| 13 | एम. ए. एम. एड्. | 01 | 1.28 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.01 चे अवलोकन कोले असता असे दिसून येते की, प्राथमेक शाळांच्या मुख्याध्यापकांची शैक्षणिक पात्रता एस. एस सी. असण्याऱ्यांचे प्रमाण 1.28 % आहे. एस. एस. सी. ज्यु. ट्रेंड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे

प्रमाण 1.28% आहे. एस. एस. सी. सि. ट्रेंड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 3.85 % आहे. एस.एस.सी. ज्यु.पी.टी.सी. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 23.08 % आहे. सातवी ज्यु.ट्रेंड असणाऱ्या मुख्याध्यापक चे प्रमाण हे. 1.28 % आहे. एस. एस. सी. डी. एड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 47.44 % आहे. एच. एस. सी. ज्यु. ट्रेंड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 6.41 % आहे. बी.ए.डी.एड. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 3.85 % आहे. बी.कॉम.बी.पीएड.असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 1.28 % आहे. एम.ए.बी.एड. असणारअया मुख्याध्यापकांचे प्रमाण 1.28 % आहे. एम.ए.एम.एड. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 1.28 % आहे.

संशोधकास असे वाटते की, प्राथमिक शाळांचे प्रशासन पाहणाऱ्या व्यक्तींची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता कमीत कमी बी. ए / बी. एससी. / बी. एड्. असावी. ज्यामुळे मुख्याध्यापक आपल्या शिक्षक सहकाऱ्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करु शकतील त्याचप्रमाणे प्रशासनहा चांगल्या प्रकारे चालवु शकतील. एस. एस. सी. डी. एड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण जास्त आहे ही बाब समाधानकारक आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेत विविधता आहे. एस.एस.सी.डी.एड. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण जास्त आहे. ही बाब समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत [प्रश्न क्रं. 3] मुख्याध्यापक पद प्रभारी आहे किंवा कायम आहे याबाबत माहिती विचारलेली होती. त्यात मिळालेली उत्तरे खालील कोष्टक क्रमांक 5.02 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.02**

**मुख्याध्यापकांच्या पदाविषयी**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | प्रभारी | 33 | 42.308 |
| 02 | कायम | 45 | 57.692 |
| | एकूण:- | 78 | 100.000 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.02 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांचे प्रशासन पाहणाऱ्या मुख्याध्यापकांचे पद कायम असणाऱ्यांचे प्रमाण 57.692% आहे. मुख्याध्यापकांचे पद प्रभारी असण्याऱ्यांचे प्रमाण 42.308 % आहे. ही बाब असमाधानकारक आहे.

प्राथमिक शाळांचे प्रशासन पाहणाऱ्या मुख्याध्यापकांचे पदच जर प्रभारी असेल तर मुख्याध्यापक मन लावून काम करणार नाहीत त्याचबरोबर तो कोणत्याही महत्वाच्या कामांची जबाबदारी स्विकारणार नाही. साहजिकच शाळेचा दर्जा व गुणवत्ता यांच्याकडे मुख्याध्यापकांचे थोड्याफार प्रमाणात तरी दुर्लक्ष होईल असे संशोधकांचे मत आहे.

प्रशासनातील ही महत्वाची अडचण दूर करण्यासाठी व्यवस्थापणाने प्रत्येक प्राथमिक शाळांवर मुख्याध्यापकांची कायम स्वरुपी नेमणूक करावी, असे संशोधकांचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 4 मध्ये मुख्याध्यापकांना प्रशासनाचा अनुभव किती आहे. याबाबत माहिती विचारलेली होती. त्यात मिळालेली उत्तरे खालील कोष्टक क्रमांक 5.03 मध्ये निर्देशित केली आहेत.

**कोष्टक क्रमांक 5.03**

**मुख्याध्यापकांचा प्रशासन अनुभव**

| अ.नं. | अनुभव वर्षे | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | 03 | 19 | 24.35 |
| 02 | 05 | 05 | 06.41 |
| 03 | 08 | 22 | 28.30 |
| 04 | 10 | 16 | 20.52 |
| 05 | 15 | 10 | 12.82 |
| 06 | 20 | 06 | 07.69 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

मुख्याध्यापक सरासरी अनुभव :- 10 वर्षे

वरील कोष्टक क्रमांक 5.03 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते, की उस्मानाबाद तालुक्यातील मुख्याध्यापकांच्या 3 वर्षे प्रशासनाचा अनुभवाचे प्रमाण 24.35 % आहे. 5 वर्षे अनुभवाचे प्रमाण 6.41 % आहे.8 वर्षे अनुभवाचे प्रमाण 28.30% आहे. 10 वर्षे अनुभवाचे प्रमाण 20.52 % आहे. 15 वर्षे अनुभवाचे प्रमाण 12.82 % आहे. 20 वर्षे अनुभवाचे प्रमाण 7.69% आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना प्रशासनाचा आठ वर्षे अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.. ही बाब समाधानकारक आहे.

वरील मध्यमानावरुन असे स्पष्ट होते की, प्रतिसादक मुख्याध्यापकांचा सरासरी अनुभव 10 वर्षाचा आहे. ही बाब समाधानकारक आहे.

5.03 **प्राथमिक शाळेविषयी सर्वसाधारण माहिती :-**

प्रश्नावलीत दुसऱ्या भागात प्राथमिक शाळेविषयी सर्वसाधारण माहिती विचारलेली होती. त्यामध्ये प्रश्न क्रं. 5 प्राथमिक शाळेचे नांव व पूर्ण पत्ता, प्रश्न क्रं. 6 शाळेचे ठिकाण शहरी/ ग्रामीण प्रश्न क्रं. 7 प्राथमिक शाळेच्या मुलांची / मुलींची / मिश्र, प्रश्न क्रं. 8 शाळेचा संवर्ग कनिष्ठ प्राथमिक / वरिष्ठ प्राथमिक प्रश्न क्रं. 9 शाळेच्या व्यवस्थापनाविषयी प्रश्न, क्रं. 10 शाळेतील एकूण तुकड्यांतील विद्यार्थी संख्या, प्रश्न क्रं. 11 शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांची संख्या प्रश्न क्रं. 12 कार्यालयीन कर्मचारी वर्गाविषयी याबाबत प्रश्न विचारण्यात आले होते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं.5 शाळेचे पूर्ण नांव व पत्ता विचारला होता . मुख्याध्यापकांनी दिलेल्या माहितीवरुन प्राथमिक शाळेचे नांव व पूर्ण पत्ता परिशीष्ट " ब " मध्ये देण्यात आला आहे. यामध्ये कांही प्राथमिक शाळा 1–4 आहेत तर काही प्राथमिक शाळा 1–7 आहेत. एकंदर प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून 130 शाळांपैकी 78 शाळांची माहिती भरुन मिळाली.त्या 78 प्राथमिक शाळांची माहिती संशोधनासाठी उपयोगात आली.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 6, प्राथमिक शाळा शहरी भागात आहे की, ग्रामीण भागात याविषयी माहिती विचारलेली होती. प्रतिसादक प्राचार्याकडुन प्राप्त झालेली माहिती विचारलेली होती. प्रतिसादक प्राचार्याकडुन प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.04 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.04**

**प्राथमिक शाळेचे ठिकाण**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | शहरी | 20 | 25.64 |
| 02 | ग्रामीण | 58 | 74.36 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.04 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शहरी भागात असणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 25.64 % आहे. ग्रामीण भागात असणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 74.36 % आहे. ग्रामीण भागात, शहरी भागापेक्षा

जास्त प्राथमिक शाळा आहेत. एकूण तालुक्यातील लोकसंख्येचा विचार केला असता 70 % लोकसंख्या ग्रामीण भागाची आहे. त्यामुळे ग्रामीण भागात असणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण जास्त आहे. ही बाब योग्यच आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 7, शाळेच्या प्रकाराविषयी (मुला / मुलींची / मिश्र) विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.05 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.05**

**शाळेच्या प्रकाराविषयी**

| अ.नं. | प्रतिसादक स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | मुलांची | 01 | 1.28 |
| 02 | मुलींची | 03 | 3.85 |
| 03 | मुला-मुलींची मिश्र | 74 | 94.87 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.05 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यात फक्त मुलांच्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 1.28 % आहे. मुलींच्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 3.85 % आहे. मुला-मुलींच्या मिश्र शाळंचे प्रमाण 94.87 % आहे.

वरील माहितीवरुन असे स्पष्ट होते की, उस्मानाबाद तालुक्यातील मुला-मुलींच्या मिश्र शाळांचे प्रमाण जास्त आहे. त्याचबरोबर मुलींच्या स्वतंत्र शाळांच्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे. मुलींच्या स्वतंत्र शाळांमुळे विशेषः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल, असे संशोधकांस वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 8 शाळेच्या संवर्गाविषयी विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून मिळालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.06 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.06**

**शाळेच्या संवर्गाविषयी**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | कनिष्ठ प्राथमिक (1–5) | 40 | 51.28 |
| 02 | वरिष्ठ प्राथमिक (1–7) | 35 | 44.87 |
| 03 | प्राथमिक व माध्यमिक (1–10) | 03 | 3.85 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.06 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, कनिष्ठ प्राथमिक स्तर असणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 51.28 % आहे. वरिष्ठ प्राथमिक स्तर असणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 44.87 % आहे. प्राथमिक व माध्यमिक स्तर असणाऱ्या शाळांचे प्रमाण 3.85 % आहे.

कनिष्ठ प्राथमिक स्तर असणाऱ्या शाळांचे प्रमाण जास्त आहे. कारण या स्तरावरील शाळा कमी लोकवस्तीच्या ठिकाणी उदा. –वाड्या, तांडे याठिकाणी आहेत. विद्यार्थी संख्या पुरेशी नसली तरी त्याठिकाणी विद्यार्थी प्राथमिक शिक्षणापासुन वंचित राहु नये म्हणुन शासनाने द्विशिक्षकी शाळा जि. प. मार्फत चालविल्या आहेत.

ग्रामीण भागातील जास्तीत जास्त कनिष्ठ प्राथमिक शाळांचा स्तर वाढवून त्याठिकाणी वरिष्ठ प्राथमिक स्तरांपर्यत (1–7 ) विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांना जवळच्या गावी शाळेला जावे लागणार नाही. त्यांच्या गावीच प्राथमिक स्तरावरील (1–7) शिक्षणाची सोय होईल व विद्यार्थ्यांची होणारी प्राथमिक शाळांमधील गळती थांबविता येईल असे संशोधकांचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 9, प्राथमिक शाळेंचे व्यवस्थापन कोणाचे आहे. असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.07 मध्ये देण्यात आलेली आहे.

## कोष्टक क्रमांक 5.07

### शाळेच्या व्यवस्थापनाविषयी

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | जिल्हा परिषद | 54 | 69.23 |
| 02 | नगरपालिका | 14 | 17.95 |
| 03 | खाजगीसंस्था | 10 | 12.82 |
| 04 | इतर | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.07 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यात जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 69.23 % आहे. नगर पालिकेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 17.95 % आहे. खाजगी संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 12.82 % आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण सर्वात जास्त आहे कारण महाराष्ट्रा मध्ये प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने जिल्हा परीषदांवर सोपविलेली आहे. त्यामुळे जि. प. च्या प्राथमिक शाळांचे प्रमाण जास्त आहे.

जि. प. च्या प्राथमिक शाळांनी आपल्या शाळेचा दर्जा व गुणवत्ता यांचेकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे संशोधकांस वाटते.त्यासाठी शासनाने व विशेषतः प्राथमिक शिक्षकांनी विशेष मेहनत घेणे आवश्याक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 10 प्राथमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींच्या संख्येबाबत विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीतून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.08 मध्ये देण्यात आलेली आहे.

कोष्टकाशी सुसंगती साधण्यासाठी आलेख
उलटा लावला आहे.

**कोष्टक क्रमांक 5.08**

**प्राथमिक शाळेतील मुलामुलींच्या संख्येबाबत**

| अ.नं. | इयत्ता | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| 01 | पहिली | 2093 | 2022 | 4115 |
| 02 | दुसरी | 1988 | 1915 | 3903 |
| 03 | तिसरी | 1894 | 1870 | 3764 |
| 04 | चौथी | 1639 | 1293 | 2982 |
| 05 | पाचवी | 873 | 853 | 1726 |
| 06 | सहावी | 773 | 667 | 1440 |
| 07 | सातवी | 687 | 560 | 1247 |
| एकूण प्रतिसाद संख्या :- | | 9,997 | 9,180 | 19,177 |
| प्रतिसाद शेकडा प्रमाण | | 52.13 % | 47.87 % | 100% |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.08 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांचे प्रमाण 52.13 % आहे. प्राथमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलींचे प्रमाण 47.87 % आहे. मुलांचे प्राथमिक शांळेतील प्रमाण मुलींपेक्षा जास्त आहे. कारण आजही मुलींच्या शिक्षणाबाबत ग्रामीण भागात अनास्था व कांही अंधश्रध्दा आहेत.

ग्रामीण भागातील मुलींच्या प्राथमिक शिक्षणात सहभाग वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापका व शिक्षक व समाज यांनी एकत्रित प्रयत्न करुन पालकांमध्ये जागृती निर्माण करावी व मुलींच्या शिक्षणातील सहभाग वाढवावा असे संशोधकांचे मत आहे. समाजात मुलींच्या शिक्षणात वाढ झाली तर साक्षारतेचे प्रमाण वाढण्यास मदत होईल.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 11, प्राथमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांची संख्या माहित करुन घेण्यासाठी विचारला

कोष्टकाशी सुसंगती साधण्यासाठी आलेख
उलटा लावला आहे.

प्रतिसादक मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीतून मिळालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.09 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.09**

**प्राथमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांची संख्या**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | स्त्री शिक्षक | 175 | 35.00 |
| 02 | पुरुष शिक्षक | 325 | 65.00 |
| | एकूण :- | 500 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.09 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये असणाऱ्या स्त्री शिक्षकांचे प्रमाण 35% आहे. प्राथमिक शाळांमध्ये असणाऱ्या पुरुष शिक्षकांचे प्रमाण 65 % आहे. पुरुष शिक्षकांचे प्रमाण स्त्री शिक्षकांपेक्ष जास्त आहे .प्राथमिक शाळांमध्ये स्त्री शिक्षकांची संख्या वाढवावी असे संशोधकांचे मत आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रं. 12, प्राथमिक शाळेतील कार्यालयीन कर्मचारी संख्या माहित करुन घेण्यासाठी विचारलेला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडुन प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.10 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.10**

**कार्यालयीन कर्मचारी संख्येविषयी**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | लिपीक | 10 | 12.82 |
| 02 | सेवक | 13 | 16.66 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.10 चे अवलोकन केले असता दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळेमध्ये

करणाऱ्या लिपीक कर्मचाऱ्यांचे प्रमाण 12.82 % आहे. सेवक कर्मचाऱ्यांचे प्रमाण 16.66 % आहे.प्राथमिक शाळेमध्ये लिपीक कर्मचाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

संशोधकाने दहा शाळांना भेटी दिल्या असता असे दिसून आले की, 8 शाळांमध्ये लिपीकांचे काम शिक्षकांवर सोपविलेल होते. त्याचबरोबर दहापैकी 6 शाळांमध्ये सेवक नाहीत.

लिपीकाचे काम शिक्षकांवर सोपविल्यामुळे शिक्षकांस अध्येपन कार्यात असंख्य अडचणी येतात. शिक्षकांचे अध्येपन कार्याकडे दुर्लक्ष होऊन, सतत तो शिक्षक कार्यालयीन कामकाजातच व्यस्त असतो याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरहोतो. त्याच प्रमाणे जेथे सेवक नाहीत त्याठिकामो शिक्षक किंवा विद्यार्थी शाळेतील रोजची कामे पाणी भरणे, वर्ग झाडणे इ. करतात. ही बाब असामाधानकारक आहे. असे संशोधकाचे मत आहे. प्रशासनाने याचा गांभीर्याने विचार करुन, प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये लिपीक व सेवकाचे नेमणूक आहे.

## 5.04 कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर

प्रश्नावलीतील तिसऱ्या भागात कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर याविषयी माहिती विचारण्यात आलेली होती. प्रश्नावलीच्या या भागामध्ये प्रश्न क्रं. 13 पासुन प्रश्न क्रं. 27 पर्यंत वेगवेगळे प्रश्न विचारण्यात आलेले होते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रं. 13, वर्गशिक्षक विद्यार्थ्यांची दररोज हजेरी घेतात का ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.11 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.11**

**विद्यार्थ्यांच्या हजेरीबाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरिल कोष्टक क्रमांक 5.11 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, विद्यार्थ्यांची दररोज हजेरी घेणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण 100.00 % आहे. ही बाब समाधानकारक आहे.

शाळेमध्ये रोज हजेरी घेतल्यामुळे, एखादा विद्यार्थी गैरहजर असल्यास त्याच्या पालकांशी संपर्क साधता येतो. व विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीचे कारण माहित करुन घेता येते रोज हजेरी घेतल्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढते असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रं. 14, महिना अखेरीस वर्गशिक्षक हजेरीवर मुख्याध्यापकांची स्वाक्षरी घेतात का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली कोष्टक क्रमांक 5.12 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.12**

**हजेरीवर मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीबाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.12 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, महिना अखेरीस हजेरीपटावर स्वाक्षरी घेणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण 100.00% आहे. महिना अखेरीस मुख्याध्यापकांनी हजेरी पाहून स्वाक्षरी केल्यामुळे, त्यांना महिनाभरात कोणता विद्यार्थी सतत गैरहजर आहे. कोणाचे नाव कमी केलेल आहे, त्याची कारणे कोणती या सगळ्या गोष्टींची माहिती मुख्याध्यापकांना शिक्षकाद्वारे करुन घेता येते. सर्वच वर्गशिक्षक महिना अखेरीस मुख्याध्यापकांची स्वाक्षरी घेतात ही बाब समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 15, उशीरा शाळेत येणाऱ्या शिक्षकांसाठी ' लेट मस्टर ' आहे का? असा प्रश्न विचारण्यात

आलेला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली कोष्टक क्रं. 5.13 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.13**

**शिक्षकांसाठी ' लेटमस्टरचा " उपयोग**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 72 | 92.307 |
| 02 | नाही | 06 | 7.692 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.13 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्रथमिक शालेमध्ये शिक्षकांसाठी " लेटमस्टर " ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 92.307 % आहे. शिक्षकांसाठी " लेटमस्टर " न ठेवणाऱ्या साळांचे प्रमाण 7.692 % आहे. संशोधकाने दहा प्राथमिक शाळांना भेटी दिल्या असता असे दिसून आले की, दहापैकी 7 शाळांमध्ये लेटमस्टर नव्हते . त्यामुळे वरील कोष्टकांतील आकडेवारी संशोधकास चुकीची वाटते.

त्याचप्रमाणे दहा मुख्याध्यापकांशी चर्चा केला असता असे दिसून आले की, मुख्याध्यापकांनी शिक्षक उशीरा आल्यामुळे जर कांही कार्यवाही केल्यास, शिक्षक वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून, पंचायत समिती, जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांकडून कार्यवाही रद्द करुन आणतात. त्यामुळे मुख्याध्यापक कांहीही करु शकत नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. प्रत्येक शाळेने शिक्षकांसाठी "लेटमस्टर " ठेवावे व उशीरा येणाऱ्या शिक्षकांवर योग्य कार्यवाही व्हावी असे संशोधकांचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 16, वेळापत्रक व वार्षिक नियोजन विहित नमुन्यात ठेवता का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.14 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.14**

**वेळापत्रक व वार्षिक नियोजन**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.14 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, वेळापत्रक व वार्षिक नियोजन विहित नमुन्यात ठेवणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 100.00% आहे. ही बाब समाधानकारक आहे.

संशोधकाने ज्या 10 प्राथमिक शाळांना भेटी दिल्या तेथे असे निदर्शनास आले, ही बाब समाधानकारक आहे. वेळापत्रक हा शाळेचा आरसा असतो, त्यामुळे शाळेत वेळापत्रकांचे अत्यंत महत्व आहे. वार्षिक नियोजनामुळे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व इतर कर्मचारी यांना वर्षभरात कोणती कामे करावयाची आहेत याचा अंदाज येतो व त्या दिशेने वाटचाल करता येते. असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 17 शाळेत येणारी पुस्तके , मासिकांची स्वतंत्र नोंद ठेवता का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.15 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.15**

**पुस्तके, मासिकांची नोंद**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 51 | 65.38 |
| 02 | नाही | 27 | 34.62 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.15 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळेत येणारी पुस्तके, मासिकांची स्वतंत्र नोंद ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 65.38 % आहे. पुस्तके, मासिके यांची स्वतंत्र नोंद न ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 34.62 % आहे.

संशोधकाने दहा शाळांना भेटी दिल्या असता असे दिसून आले की, 8 शाळामध्ये पुस्तके, मासिके यांची स्वतंत्र नोंद नाही. शाळेला मिळणाऱ्या पुस्ताकंची व मासिकांची संख्या अत्यंत अपुरी आहे. बऱ्याच शाळांमध्ये महिन्यासाठी एखादे मासिक येते. बऱ्याच शाळात वर्तमानपत्र ही येत नाहीत.प्राथमिक शाळेत ग्रंथपाल नाही. त्यामुळे ग्रंथालयाची ही कामे शिक्षकच पाहत असतात. साहजिकच ते पुरेसा वेळ ग्रंथालयासाठी देऊ शकत नाहीत.

शासनाने ग्रंथालयासाठी प्राथमिक शाळांना पुरेसे अनुदान दयावे. प्रत्येक शाळेत स्वतंत्र ग्रंथालय असावे त्यासाठी ग्रंथपालाची नेमणूक करावी. म्हणजे विद्यार्थी, शिक्षक यांना शाळेतच पुस्तके, मासिक व वर्तमानपत्र उपलब्ध होऊ शकतील. त्यासाठी शाळेचे ग्रंथालय समृध्द असावे. त्यासाठी मुख्याध्यापकांनी या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 18 शाळेत केलेल्या वर्षभरातील किरकोळ दुरुस्तीची नोंद ठेवता काय ? असा प्रश्न विचारण्यात आला होता.प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.16 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.16**

**वर्षभरातील किरकोळ दुरुस्तीची नोंद**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 69 | 88.46 |
| 02 | नाही | 09 | 11.54 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.16 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळेत वर्षभरात केलेल्या दुरुस्तीची नोंद ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 88.46 % आहे. वर्षभरातील दुरुस्तीची नोंद न ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 11.54 % आहे. सर्वच प्राथमिक शाळांनी किरकोळ दुरुस्तीची नोंद ठेवणे आवश्यक आहे. ज्यामुळे शाळेला मिळणारे अनुदान व खर्च यांचा मेळ बसेल. दुरुस्तीची नोंद ठेवल्यास , शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचा योग्य वापर होइल, असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रं. 19, तपासणी अधिकाऱ्यासाठी नोंदवही ठेवता काय? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतीसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.17 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.17**

**तपासणी अधिकाऱ्यांसाठी नोंदवही**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.18 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, तपासणी अधिकाऱ्यांसाठी नोंदवही ठेवणाऱ्या

शाळांचे प्रमाण 100.00 % आहे.

संशोधकाने दहा शाळांना भेटी दिल्या असता असे दिसून आले की, सर्वच शाळांकडे तपासणी अधिकाऱ्यांसाठी नोंदवह्या ठेवण्यात आल्या होत्या. परंतु फक्त 10 % शाळांनाच तपासणी अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या होत्या. केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी हे महिन्यातून दोन भेटी देतात त्यांच्या भेटीही धावत्या असतात. गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या तर वर्षातून प्राथमिक शाळांना एखादी भेटहोते. तपासणी अधिकाऱ्यांनी प्रत्येक शाळेस वर्षातून 10 भेटी दयाव्यात व शिक्षक, मुख्याध्यापक यांना मार्गदर्शन करावे असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 20, दाखला देताना दाखल्यावरील नोंदी मुख्याध्यापक स्वतः तपासतात का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.18 मध्ये देणय्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.18**

**दाखल्यावरील नोंदी तपासणे**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.18 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, दाखल्यावरील नोंदी मुख्याध्यापक स्वतः तपासणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100.00% आहे.

शाळेच्या दाखल्यावरील नोंदी अत्यंत महत्वाच्या असतात. ज्यामध्ये विद्यार्थ्यांचे नाव , जन्मतारीख, जात इ. महत्वाच्या नोंदी असतात. या नोंदी 100.00 % मुख्याध्यापक तपासतात.विद्यार्थ्यांची जन्मतारीख व जात बदलल्याच्या तक्रारी न येण्यासाठी मुख्याध्यापकांनी दाखल्यावरील नोंदी अत्यंत काळजीपुर्वक तपासव्यात असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 21, ग्रामशिक्षण समितीच्या कार्यविषयक अहवालाच्या नोंदी ठेवता का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.19 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.19**

**ग्रामशिक्षण समिती, अहवाल व नोंदी**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 60 | 76.92 |
| 02 | नाही | 18 | 23.08 |
| | एकुण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.19 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ग्रामशिक्षण समितीच्या कार्याविषयी अहवालाच्या नोंदी ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 76.92 % आहे. ग्रामशिक्षण समितीच्या कार्याविषक अहवालाच्या नोंदी न ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 23.08 % आहे.

ग्रामीण भागामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या विविध योजनांमध्ये स्थानिक समाजाचा सहभाग वाढविण्यासाठी ग्रामशिक्षण समित्यांची स्थापना शासनाने केल्या . ज्या ग्रामीण शिक्षण समित्या आहेत, त्यांचे सदस्य सक्रीय नाहीत. महिन्यासाठी हे सदस्य वेळेवर उपस्थित राहत नाहीत. या सदस्यांची व समाजांची उदासीनता असल्यामुळे ग्रामशिक्षण समिती क्रियाशीलपणे काम करीत नाही. या समित्या क्रियाशील करणे अत्यंत महत्वाचे आहे, त्यासाठी मुख्याध्यापकांनी विशेष प्रयत्न करावेत असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 22, खात्यांची परिपत्रके संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणली जातात का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक5.20 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.20**

**खात्यांची परिपत्रके शिक्षकांच्या निदर्शनास आणणेबाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.20 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, खात्यांची परिपत्रके संबंधित शिक्षकांच्या निदर्शनासआणणाऱ्या शाळांचे प्रमाण 100.00 % आहे. ही बाब समाधानकारक आहे. खात्यांची परिपत्रके शिक्षकांच्या निदर्शनास आणल्यामुळे त्यांना शिक्षणक्षेत्रामध्ये होणाऱ्या विविध बदलांची माहिती मिळते असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्र. 23, शिक्षक व कर्मचारी यांचे सेवापुस्तके अद्ययावत आहेत का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त माहिती कोष्टक क्रमांक 5.21 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.21**

**शिक्षक व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके बाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 77 | 98.72 |
| 02 | नाही | 01 | 1.28 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.21 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षक व कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 98.72 % आहे. सेवापुस्तके अद्ययावत न ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 1.28 % आहे.

शिक्षक व कर्मचारी यांच्या आयुष्यभराच्या कामाचा आरसा म्हणजे सेवापुस्तके असते. त्यामध्ये शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या चांगल्या कामाची तसेच इतर गोष्टींची ही नोंद घेतलेली असते.

सेवापुस्तिका अद्ययावत नसल्यास शिक्षकामच्या पेंन्शन च्या वेळी त्यांना पेन्शन लवकर मिळत नाही. त्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागतो. त्यासाठी मुख्याध्यापकांनी शिक्षक व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवावीत .

वरील प्रतिसादावरुन असे दिसून येते की, बहुतांशी सर्व मुख्याध्यापक सेवापुस्तके अद्ययावत ठेवतात ही बाब समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 24, रोजकिर्द व खतावणी वेळवेळच्या लिहीता का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्रप्त झालेली माहिती कोष्टक क्रं. 5.22 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.22**

**रोजकिर्द व खतावणीचे लेखन**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 57.00 | 73.07 |
| 02 | नाही | 21 | 26.92 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.22 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, रोजकिर्द व खतावणी वेळोवेळी लिहणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 73.07% आहे. रोजकिर्द व खतावणी वेळोवेळी न लिहणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 26.92% आहे. रोजकीर्द व खतावणी रोजच्या रोज लिहिणे अत्यंत महत्वाचे आहे. रोजकिर्द व खतावणी रोज न लिहिल्यास शासनाकडून येणाऱ्या अनुदानाचा जमाखर्च व्यवस्थित ठेवता येणार नाही. व त्यामुळे आर्थिक बाबींकडे दुर्लक्ष होणय्याची शक्यता आह. त्यामुळे प्रत्येक शालेत रोजकिर्द व खतावणी रोजच्या रोज लिहावी असे संशोधकाचे मत आहे.

ज्या शाळांमध्ये रोजकिर्द व खतावणी लिहली जात नाही त्याकडे मुख्याध्यापकांनी प्रशासक म्हणून ही कामगिरी वेळच्या वेळी पार पाडणे आवश्यक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 25. शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेसे आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.23**

**शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची पर्याप्तता**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 51 | 65.38 |
| 02 | नाही | 27 | 34.62 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.23 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेसे आहे असे मत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 65.38 % आहे. अनुदान पुरेसे नाही असे मत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 34.62 % आहे.

संशोधकाने दहा प्राथमिक शाळांना भेट देऊन मुख्याध्यापकांशी अनुदानाविषयी चर्चा केली असता असे दिसून आले की, शासनाकडून प्राथमिक शाळांना मिळणारे अनुदान अपुरे आहे. सन. 1994-95 पासुन शासन प्राथमिक शाळांना 4% अनुदान देत आहे . याप्र्वी शासन , प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरवर्षी 55 व प्रत्येक शिक्षकांमागे दरवर्षी 4 रु. अनुदान देत होते. ते अत्यंत कमी होते शासन स्थानिक स्वराज्य संस्था ( जि. प. / न. प. ) ज्या प्रा. शाळा चालवितात त्यांना खर्चासाठी 4 % अनुदान व खाजगी संस्थाना हे अनुदान 8% एवढे देण्यात येते.

शासनाने प्राथमिक शाळांना कमीत कमी 10 % अनुदान द्यावे . जेणेकरुन प्राथमिक शाळांना त्यांचा दर्जा सुधारता

येईल व प्रगती करता येईल असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 26 शाळेकडे खालील फाईल –रजिस्टर आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता . प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.24 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.24**

**फाईल – रजिस्टरची उपलब्धता**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | प्रवेश अर्ज फाईल | 78 | 100.00 |
| 02 | शेरेबुक | 78 | 100.00 |
| 03 | परिपत्रक नस्ती | 78 | 100.00 |
| 04 | हालचाल नोंदवही | 78 | 100.00 |
| 05 | आरोग्य तपासणी नोंदवही | 68 | 87.17 |
| 06 | इतर | 00 | 00.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.24 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळेत प्रवेश फाईल, शेरेबुक, परिपत्रक नस्ती, हालचाल नोदवही ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 100.00 % आहे. आरोग्य तपासणी नोंदवही ठेवणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 87.17 % आहे. ही बाब समाधानकारक आहे. आरोग्य तपासणी नोंदवही सर्वच शाळांनी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यामुळे शिक्षक व पालक यांना विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी माहिती मिळेल. त्यासाठी प्रत्येक मुख्याध्यापकांनी या बाबी कडे विशेष लक्ष दयावे.

प्रश्नावलीत प्रश्नक्रमांक 27, शासनाच्या प्राथमिक शिक्षण विषयक कोणत्या योजना राबविता, असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.25 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.25**

**प्राथमिक शिक्षण विषयक योजना**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | गणवेश वाटप | 60 | 76.92 |
| 02 | पुस्तकपेढी | 69 | 88.46 |
| 03 | लेखनसाहित्य | 53 | 67.94 |
| 04 | उपस्थिती भत्ता | 57 | 73.07 |
| 05 | इतर | 00 | 00.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.25 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गणवेष वाटप राबविणाऱ्या शाळांचे प्रमाण 76.92 आहे. पुस्तक पेढी राबविणाऱ्या शाळांचे प्रमाण 88.46 % आहे. लेखन साहित्य योजना राबविणाऱ्या शाळांचे प्रमाण 67.94 % आहे. मुलींसाठी उपस्थिती भत्ता राबविणाऱ्या शाळांचे प्रमाण 73.07 % आहे. समाजातील गरीब मुलांसाठी गणवेश वाटप व पुस्तकपेढी राबविणाऱ्या शाळांचे प्रमाण समाधानकारक आहे. तरी यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. लेखन साहित्य व उपस्थिती भत्ता अत्यंत प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे. विशेषतः मुलींसाठी उपस्थिती भत्ता योजना अधिक कार्यक्षमपणे राबवावी त्यामुळे मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढेल.

विशेषतः या योजना मुख्याध्यापकांनी ग्रामीण भागात व्यवस्थितपणे राबविल्यास प्राथमिक शिक्षणामध्ये गळती व स्थगितीचे प्रमाण. कमी होईल. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढेल असे संशोधकांचे मत आहे.

5.05 **शिक्षकांविषयी**

प्रश्नावलीच्या चौथ्या भागात शाळेतील शिक्षकांविषयी, मुख्याध्यापकांना माहिती विचारलेली होती. शाळेमध्ये मुख्याध्यापक व शिक्षक यांचे संबंध सौहार्दपूर्ण असणे आवश्यक आहे. तरच मुख्याध्यापक आपली शैक्षणिक व प्रशासकीय कामे व्यवस्थितपणे पार पाडता येतील.

प्रश्नावलीच्या या चौथ्या भागात प्रश्न क्र. 28 पासून प्रश्न क्र 43 पर्यंत शिक्षकांविषयी वेगवेगळे प्रश्न मुख्याध्यापकांना विचारण्यात आले होते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र. 28, सर्व विषयांस पुरेसे शिक्षक आहेत का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.26 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.26**

**विषय शिक्षकांचे प्रमाण**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 63 | 80.76 |
| 02 | नाही | 15 | 19.24 |
| | एकुण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.26 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सर्व विषयांस पुरेसे शिक्षक असणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 80.76 % आहे. सर्व विषयांस पुरेसे शिक्षक नसणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 19.24 % आहे. प्राथमिक शिक्षण हा सर्वच शिक्षणाचा पाया आहे. सर्वच प्राथमिक शाळेमध्ये सर्व विषयांचे शिक्षक असणे आवश्यक आहे. व त्यासाठी सर्वच शाळांच्या व्यवस्थापनांनी शिक्षकांची वेळेवर नेमणूक करावी व शाळांना पुरेसे शिक्षक उपलब्ध करुन दयावेत असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 29, शिक्षक घटक नियोजन / वार्षिक नियोजन करतात का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडुन प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.27 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.27**

**घटक नियोजन / वार्षिक नियोजनाची तयारी**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.27 चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, घटक नियोजन व वार्षिक नियोजन करणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 100.00 % आहे. ही बाब समाधानकारक आहे. संशोधकांनी ज्या दहा शाळांना भेटी दिल्या असता असे दिसून आले की, सर्वच शाळांनी घटकनियोजन व वार्षिक नियोजन केलेल होते. ही बाब चांगली आहे. संशोधकांस असे वाटते की, सर्वच प्राथमिक शाळांनी घटक नियोजन व वार्षिक नियोजन याची योग्यप्रमाणे अंमलबजावणी करावी जेणेकरुन शाळांची शैक्षणिक प्रगती होईल.

प्रश्नावलीत प्रश्न 30, शिक्षक पाठटाचण काढतात का? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.28 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.28**

**पाठटाचणाची तयारी**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.28 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळेतील पाठटाचण काढणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण 100.00 % आहे. ही बाब समाधानकारक आहे.

रोज पाठटाचणकाढल्यामुळे शिक्षकांना काय शिकवायचे याची पुर्व कल्पना येते. त्याप्रमाणे शिक्षक तयारी करुन प्रभावी अध्यापन करु शकतो. याकामी शिक्षक आपल्या अध्यापनात विविधता आणू शकतील असे संशोधकांचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 31, शिक्षकांचे पाठनिरीक्षण करता का? असा विचारण्यात आला होता प्रतिसादक मुख्याध्कापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.29 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.29**

**शिक्षकांचे पाठनिरीक्षण बाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.29 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे पाठनिरीक्षण करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100.00 % आहे. ही बाब समाधाकारक आहे. मुख्याध्यापकांनी शिक्षकांचे

पाठनिरीक्षण करतांना लोकशाही मार्गाचा अवलंब करावा. शिक्षकांना विश्वासात घेऊन त्यांच्या चुका निदर्शनास आणून दयाव्यात व त्यांना मार्गदर्शन करावे. शिक्षकांच्या चांगल्या गोष्टीसाठी त्यांची प्रशंसा करावी, त्यांना प्रोत्साहन दयावे. त्यामुळे शिक्षक आपले अध्यापनाचे काम अधिक कार्यक्षमपणे करतील असे संशोधकांस वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 32, एका शिक्षकाचे महिन्यातून किती वेळा पाठनिरीक्षण करता ? असा विचारण्यात आलाहोता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.30 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.30**

**महिन्यातील पाठनिरिक्षण**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | दोन वेळा | 35 | 44.88 |
| 02 | तीन वेळा | 14 | 17.94 |
| 03 | चार वेळा | 29 | 37.18 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.30 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, महिन्यातून दोनवेळा पाठनिरीक्षण करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 44.88 % आहे. महिन्यातून तीनवेळा पाठनिरीक्षण करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 17.94% आहे. महिन्यातुन चारवेळा पाठनिरीक्षण करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 37.18 % आहे.

महिन्यातून प्रत्येक शिक्षकांचे चारवेळा पाठनिरीक्षण व्हावी अशी अपेक्षा असते. शिक्षकांच्या नियमित पाठनिरीक्षणामुळे शिक्षक आपल्या तासाची उत्तम तयारी करुन येईल व त्यांना मुख्याध्यापक पाठनिरीक्षणास येतात याची नेहमी जाणीव राहील. त्यासाठी मुख्याध्यापकांनी महिन्यातुन चारवेळा पाठनिरीक्षण करावे असे संशोधकाचे मतआहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 33, पाठनिरीक्षण करताना कोणत्याबाबी लक्षात घेता ? असा विचारण्यात आला होता. त्याबाबत

प्रतिसादक मुख्याध्यापकांनी खालील उत्तरे दिलेली आहेत. ( कंसात वारंवारिता )

1) शिक्षकांची अध्यापन पध्दती, त्यांचे पुर्वज्ञान, विषयांची तयारी व विषयावरील प्रभुत्व पाहिले जाते. ( 75)

2)शिक्षकांचे पाठटाचण , पाठांचे नियोजन, पाठ विषयाला अनुसरुन आहे काय ? ( 60 )

3) शिक्षकांचे भाषाकौशल्य, फलकलेखन , प्रश्नकौशल्य, विद्यार्थ्यांचा पाठात सहभाग व वर्गनियंत्रण. ( 68 )

4) अभ्यासक्रमांची माहिती व उद्दिष्टे पाहिली जातात ( 65 )

5) प्रसंगावधान , अभिनय, विद्यार्थ्यांची उपस्थिती व स्वाध्याय पाहिले जाते. ( 48 )

या गोष्टींचा विचार पाठनिरीक्षण करतांना मुख्याध्यापक करतात.

प्रश्न क्र. 34, पाठनिरीक्षणानंतर सुचना / मार्गदर्शन / प्रशंसा कोणत्या प्रकारे करती ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.31 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.31**

**पाठनिरिक्षणानंतर केल्या जाणाऱ्या सूचना / मार्गदर्शन / प्रशंसा**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | तोंडी व लेखीसुचना | 26 | 33.33 |
| 02 | मार्गदर्शन | 35 | 44.87 |
| 03 | प्रशंसा | 17 | 21.80 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमाक 5.31 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षकांच्या पाठनिरिक्षणानंतर तोंडी व लेखी सुचना देणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 33.33% आहे. शिक्षकांच्या पाठनिरिक्षणानंतर मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 44.87 % आहे. पाठनिरीक्षणानंतर प्रशंसा करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 21.80 % आहे.

शिक्षकांच्या पाठनिरीक्षणानंतर मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण अधिक आहे. ही बाब समाधानकारक आहे. शिक्षकांस सहकार्याच्या भावनेतुन संबंध ठेवल्यास व मार्गदर्शन केल्यास शिक्षकात निश्चित सुधारणा घडून येईल, असे संशोधकाचे मत आहे. शिक्षकांच्या चांगल्या कामासाठी त्यांची प्रशंसा करावी म्हणजे शिक्षक अधिक जोमाने काम करतील .

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 35, एका वर्षातून शिक्षकांसाठी किती वेळा नमुना पाठ घेता ? असा विचारण्याआला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.32 मध्ये देण्यात आहे.

**कोष्टक क्रमांक 5.32**

**शिक्षकांसाठी नमुना पाठ**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | दोन वेळा | 10 | 12.82 |
| 02 | पाचवेळा | 09 | 11.55 |
| 03 | आठ वेळा | 08 | 10.25 |
| 04 | दहावेळा | 51 | 65.38 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.32 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, वर्षातून दोनवेळा नमुना पाठ घेणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 12.82 % आहे. वर्षातून पाचवेळा नमुना पाठ घेणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 11.55 % आहे. वर्षातुन आठ वेळा पाठ घेणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 10.25 % आहे. वर्षातून दहावेळा पाठ घेणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 65.38% आहे.

वर्षातून दहावेळा नमुना पाठ घेणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण जास्त आहे. वर्षातून दहा पाठ घेतल्यामुळे शिक्षकांना अध्यापन कसे करावे , शैक्षणिक साधने कोणती वापरावीत या विषयी मार्गदर्शन मिळते त्यासाठी सर्वच मुख्याख्याध्यापकांना एका वर्षातदहा नमुना पाठ घ्यावेत असे संशोधकांचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्र. 36, शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा / साहित्याचा वापर करतात का? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.33 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.33**

**शैक्षणिक साधनांचा वापर**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 70 | 89.74 |
| 02 | नाही | 08 | 10.26 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.33 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा / साहित्याचा वापर करतात असे मत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 89.74 % आहे. शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा / साहित्याचा वापर करीत नाहीत असे मत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 10.26 % आहे. अध्यापन करताना शैक्षणिक साधनांचा उपयोग करणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त आहे. शैक्षणिक साधनांचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी मदत होते. त्यासाठी शिक्षकांनी शैक्षणिक साधनांचा उपयोग करणे अत्यंत आवश्यक आहे. अध्यापन प्रभावी व आनंददायी करण्यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर आवश्यक ठरते. मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांना शैक्षणिक साधने वापरुन अध्यापन करण्यासाठी मार्गदर्शन करावे असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्र. 37, शिक्षक दिलेला अभ्यासक्रम निर्धारित वेळेत पूर्ण करतात का? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.34 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.34**

**अभ्यास क्रम नियोजित वेळेत पूर्ण करणे**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 63 | 80.76 |
| 02 | नाही | 15 | 19.24 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.34 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षक दिलेला अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करतात असे मत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 80.76 % आहे. दिलेला अभ्यासक्रम शिक्षक वेळेत पुर्ण करीत नाहीत असे मत व्यक्त करण्याऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 19.24 % आहे.शाळेतील सर्वच शिक्षकांचा अभ्यासक्रम दिलेल्या निर्धारित वेळेत पूर्ण होणे आवश्यक असते. जे शिक्षक आपला अभ्यासक्रम निर्धारित वेळेत पूर्ण करीत नाहीत त्यांना जादा तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करण्याविषयी मुख्याध्यापकांनी सूचना दयाव्यात . मुख्याध्यापकांनी प्रत्येक महिन्याकाठी प्रत्येक शिक्षकांचा किती अभ्यासक्रम झाला तो नियोजनाप्रमाणे आहे किंवी नाही हे पाहिले पाहिजे. हे पाहिल्यास शिक्षकांचा अभ्यासक्रम निर्धारित वेळेत पूर्ण होईल असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 38, अभ्यासक्रम पूर्ण न झाल्यास कोणते उपाय करता? असा विचारलेला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.35 मध्ये देण्यात आलेली आहे.

कोष्टक क्रमांक 5.35

अभ्यासक्रम पूर्ततेबाबत उपाय

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | उपचारात्मक ज्यादा तास घेणे | 57 | 73.08 |
| | अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा | | |
| 02 | दंडात्मक - तोंडी सूचना करणे दाखवा नोटीस | 11 | 14.10 |
| 03 | अनुत्तरीत | 10 | 12.82 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.35 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की,शिक्षकांचा अभ्यासक्रम पुर्ण न झाल्यास उपचारात्मक उपाययोजना करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 73.08 % आहे. दंडात्मक उपाययोजना करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 14.10 % आहे. अनुत्तरीत प्रतिसादाचे प्रमाण 12.82 % आहे. अभ्यासक्रम पूर्ण न झाल्यास उपचारात्मक उपाययोजना करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाणजास्त आहे. शिक्षकांस ज्यादा तास घेण्यास लावून त्याचप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ततेसाठी सतत पाठपुरावा केल्यास अभ्यासक्रम लवकर पुर्ण होईल. शिक्षक-मुख्याध्यापक संबंध चांगले राहतील व शिक्षक अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करतील. दंडात्मक उपायापेक्षा उपचारात्मक उपाय अधिक प्रभावी ठरु शकतील असे संशोधकाचे मत आहे.अनुत्तरीत प्रतिसाद 12.82 % आहे. याचा अर्थ जर शिक्षकांने अभ्यासक्रम पूर्ण केला नाही तर मुख्याध्यापक कोणतीही उपाययोजना करीत नाहीत, ही खेदाची बाब आहे. त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होते. त्याला पुर्णतः प्रशासन जबाबदार आहे. असे संशोधकास वाटते. तरी प्रशासनाने या बाबीकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 39, सर्व शिक्षक मुख्यालयास राहतात का ? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त माहिती कोष्टक क्रमांक 5.36 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.36**

**शिक्षक मुख्यालयात राहणेबाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 68 | 86.18 |
| 02 | नाही | 10 | 12.82 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.36 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षक मुख्यालयाच्या ठिकाणी राहत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 87.18 % आहे. शिक्षक मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नाहीत असे मत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 12.82 % आहे.

सर्वच शिक्षकांनी मुख्यालयास राहणे आवश्यक आहे. शिक्षक मुख्यालयास राहिला तर विद्यार्थींना त्यांच्या अडचणी सोडवून घेता येतील त्याच प्रमाणे विद्यार्थी व समाजामध्ये शिक्षकांचे चांगले संबंध निर्माण होतील. त्यासाठी सर्व मुख्याध्यापकांनी आपल्या शिक्षकांना मुख्यालयास राहण्याची आवश्यकता पटवून दयावी व त्यांना आपल्या मुख्यालायास राहण्याची सक्ती करावी असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 40, शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेता का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.37 मध्ये देण्यात आली आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्र. 40, शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेता का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.37 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.37**

**शिक्षकांची मासिकसभा**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 78 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.37 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षकांची मासिकसभा दरमहा घेणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100.00 % आहे. ही बाब समाधानकारक आहे.

शिक्षकांची मासिक सभा घेणे अत्यंत आवश्यक आहे. मासिक सभेमुळे शिक्षक आपल्या अडचणी मुख्याध्यापाकांसमोर मांडू शकतात. त्याचबरोबर महिनाभरात झालेले शैक्षणिक काम, अभ्यासक्रम व इतर कामांचा आढावा घेता येतो. तसेच मुख्याध्यापक शिक्षकांना मार्गदर्शन करु शकतात असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 41, शिक्षकांच्या मासिक सभेत कोणकोणत्या बाबींचा आढावा घेण्यात येतो? असा विचारण्यात आला होता. त्याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकाकडून पुढील प्रमाणे उत्तरे मिळालेली आहेत. ( कंसात वारंवारिता )

1) शालेय अध्ययन अध्यापन कामकाज. ( 70 )

2) नियोजना प्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे किंवा नाही ते पाहणे. (69)

3) विद्यार्थ्यांची उपस्थिती, गुणवत्ता वाढ या विषयावर चर्चा करणे. (60)

4) शालेय अडचणी, शिक्षकांच्या अडीअडचणी यावर चर्चा करणे. (48)

5) महिनाभरात आलेली परिपत्रके, शिक्षकांच्या निदर्शनास आणणे. (78)

6) शैक्षणिक साहित्य तयार करणे व त्याचा वापर यांविषयी चर्चा करणे. (65)

या सर्व गोष्टींचा आढावा मासिक सभेत घेतला जातो.

प्रश्नावलीत प्रश्नक्रमांक 42, शिक्षकांना प्रशिक्षणास पाठविता का? असा विचारण्यात आला. प्रतिसादक मुख्याध्यापकाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.38 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.38**

**शिक्षकांच्या प्रशिक्षणा बाबत**

| अ.न. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | होय | 78 | 100.00 |
| 2) | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.38 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षणास पाठविण्याचे प्रमाण 100% आहे. ही बाब समाधानकारक आहे.शिक्षकास प्रशिक्षणास पाठविल्यामुळे त्यांना शिक्षणक्षेत्रातील नविन संकल्पनांची माहिती होते. शिक्षकांना प्रभावी अध्यापन करण्यासाठी प्रशिक्षणाचा उपयोग होतो, असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्नक्रमांक 43, शाळासुरु असताना शिक्षकास प्रशिक्षणास पाठविल्यास काय परिणाम होतो? असा विचारण्यात आला होता. त्याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली उत्तरे खालील प्रमाणे आहेत. ( कंसात वारंवारिता )

शाळासुरु असताना शिक्षकास प्रशिक्षणास पाठविल्यास खालील परिणाम होतात.

1) अध्यापणाचे काम व्यवस्थित होत नाही. (16)

2) संबंधित वर्गात शिकविणाऱ्या शिक्षकाचा अभ्यासक्रम मागे राहतो, तो पूर्ण होत नाही. (41)

3) संबंधित शिक्षकाचा वर्ग व विषय दूर्लक्षिला जातो. (28)

4) वर्ग एकत्रित करावे लागतात. (15)

5) विद्यार्थी उपस्थिती कमी होते. (10)

6) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. (7)

यावरुन असे स्पष्ट होते की, शिक्षकांचे प्रशिक्षण शाळा सुरु असताना ठेवल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी सुट्टीच्या काळात शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय करावी असे संशोधकास वाटते.

5.06 **विद्यार्थ्यांविषयी**

प्रश्नावलीतील पाचव्या भागात प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांविषयी माहिती विचारलेली होती. त्यामध्ये प्रश्नक्रमांक 44 ते प्रश्नक्रमांक 55 पर्यंत विद्यार्थ्यांशी निगडीत प्रश्न विचारण्यात आले होते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 44, शाळेत उशीरा येणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षा करता का? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.39 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.39**

**उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षा करण्याविषयी**

| अ.न. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | होय | 78 | 100.00 |
| 2) | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण : | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.39 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, शाळेत उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षा करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100 % आहे. शाळेत उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यास समजावून सांगितल्यास, विद्यार्थी शाळेत येतील असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 45, शिक्षा करत असल्यास, कोणती शिक्षा करतात? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांनी पुढील प्रमाणे उत्तरे दिलेली आहेत. ( कंसात वारंवारिता )

1) विद्यार्थ्यास उशिर का झाला याची शहनेशा केली जाते व अडचण जाणून घेतली जाते.(9)

2) उशिरा न येण्याविषयी समजावून सांगितले जाते. (30)

3) पालकास बोलावून सूचना दिली जाते.(21)

4) शारिरीक शिक्षा व व्यायाम दिला जातो (32)

विद्यार्थ्यांची अडचण जाणून घेउन त्यास शाळेत वेळेवर येण्याविषयी आपुलकीने सांगावे. जेणेकरुन विद्यार्थी उशिरा करणार नाही असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 46, विद्यार्थ्यांच्या 100% पटनोंदणीसाठी काय करता? असा विचारण्यात आला होता. त्याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांनी पुढील प्रमाणे उत्तरे दिलेली आहेत. ( कंसात वारंवारिता )

1) एप्रिल महिन्यात प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करुन यादी बनविणे. (46)

2) पालक भेटी – पाल्याला शाळेत प्रवेश देण्याविषयी विनंती / सूचना / मार्गदर्शन करणे. (50)

3) पटनोंदणी सप्ताह, शैक्षणिक दिंडी काढणे. (7)

4) ग्रामशिक्षण सभा व मातृप्रबोधन.(10)

मुख्याध्यपाकांनी शिक्षक व समाजाचे सहकार्य घेतले असता 100% पटनोंदणीचे उद्दिष्ट साध्य करता येईल. विद्यार्थीसंख्या टिकवून ठेवणे आवश्यक आहे. असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 47, अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यासाठी काय करतात? असा विचारण्यात आला होता. त्याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली उत्तरे खाली देण्यात आली आहेत.( कंसात वारंवारिता)

1) अशा विद्यार्थ्यांचे ज्यादा तास घेणे (50)

2) पालकांना वैयक्तिक अभ्यासाकडे लक्ष देण्यास सांगणे.(10)

3) विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष पुरविणे व त्यांचा सराव करुन घेणे (14)

4) विद्यार्थ्यांशी सहानुभूतीने वागणे, गृहपाठ देणे व दिलेल्या अभ्यासाबाबत चौकशी करणे (15)

5) हुशार विद्यार्थ्यांशी जोडी लावून देणे (5)

मुख्याध्यापकांनी वरिल उपाय प्रभावीपणे राबविल्यास जे विद्यार्थी अभ्यासात मागे आहेत त्यांना इतर मुलांबरोबर आणता येईल व त्यांची शैक्षणिक प्रगती होईल, असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 48, विद्यार्थ्यांमध्ये शाळेची आवड निर्माण होण्यासाठी कोणते उपक्रम राबविता? असा प्रश्न विचारण्यात आला होता. याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांनी खालील उत्तरे दिली. (कंसात वारंवारिता)

1) राष्ट्रीय सण, थोरपुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथी साजरी करणे. (10)

2) विद्यार्थ्यासाठी मध्यान्ह जेवणाची व्यवस्था करणे (16)

3) खेळ, सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करणे. (60)

4) शैक्षणिक साहित्य वापरुन प्रभावी व हसत खेळत अध्यापन करणे.(15)

5) विविध स्पर्धांचे आयोजन उदा. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा. (40)

6) दूरदर्शन वरील शैक्षणिक कार्यक्रम दाखविणे. (5)

विद्यार्थ्यासाठी वरील उपक्रम राबविले तर लहान वयात त्यांना शिक्षणाविषयी आवड व आकर्षण निर्माण होईल. विद्यार्थ्यांचा शाळेकडे येण्याचा ओढा वाढेल. मुख्याध्यापकांनी प्रशासकीय प्रमुख या नात्याने या सर्व गोष्टीकडे स्वतः लक्ष द्यावे, असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 49, शाळेच्या गुणवत्ता विकासासाठी कोणते प्रयत्न करता? असा प्रश्न विचारण्यात आला होता. याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली उत्तरे खालील प्रमाणे आहेत. ( कंसात वारंवारिता )

1) अभ्यासात कच्चे असणाऱ्या मुलांचे ज्यादा तास घेणे. (45)

2) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहन व बक्षिस देणे.(16)

3) शिक्षकांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन करणे.(8)

4) किमान अध्ययनक्षमता प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे.(28)

5) विद्यार्थासाठी खेळांचे सामने घेणे.(10)

6) शैक्षणिक साहित्याचा वापर करुन प्रभावी अध्यापन करणे.(25)

यावरुन असे स्पष्ट होते की, मुख्याध्यापक शाळांच्या गुणवत्ता विकासासाठी वेगवेगळे प्रयत्न करतात ही बाब समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 50, सहा ते चौदा वयोगटातील मुलांच्या सार्वत्रिक, मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या

कायद्याची अंमलबजावणी करता का? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.40 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.40**

**प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी**

| अ.न. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | होय | 69 | 88.46 |
| 2) | नाही | 09 | 11.54 |
| | एकूण : | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.40 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, सहा ते चौदा वयोगटातील मुलांच्या सार्वत्रिक, मोफत व सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी केली जाते असे मत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 88.46% आहे. प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी करु शकत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 11.54% आहे.

भारतीय घटनेच्या 45 व्या कलमान्वये प्राथमिक शिक्षणाचा कायदा करण्यात आला. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. संशोधकास असे वाटते की, शिक्षण क्षेत्रातील प्रशासनाने प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित पार न पाडल्यामुळे आजही प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही. प्राथमिक शिक्षणाचा फक्त कायदा करुन चालणार नाही, त्यासाठी समाजामध्ये शिक्षणाविषयी जागृती झाली पाहिजे. ग्रामीण भागातील मुलांना प्राथमिक शिक्षणाच्या सोयी करुन दिल्या पाहिजेत. जेणे करुन कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. त्याच बरोबर मुलिंच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे. यासाठी शिक्षण क्षेत्रातील प्रशासनाने जाणिवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे संशोधकाचे मत आहे.

प्राथमिक शिक्षण मुलांनी घेतले नाही तर निरक्षरांच्या संख्येत वाढ होईल. त्यासाठी आपणास पुन्हा याच प्रौढांना साक्षर

करण्याचा कार्यक्रम राबवावा लागेल. त्यासाठी अगोदरच प्राथमिक शिक्षण कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित केली तर, प्रौढशिक्षणाची गरज भासणार नाही व साक्षरता वाढेल.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक 51, विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापणाशिवाय शिक्षकांना इतर कोणती कामे करावी लागतात. असा विचारण्यात आला होता. याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली उत्तरे खालील प्रमाणे आहेत. ( कंसात वारंवारिता )

1) मतदार याद्या बनविणे (37)

2) कुटूंबनियोजन कार्यक्रमात सहभाग घेणे.(49)

3) जनगणना करणे.(55)

4) निवडणूका पार पाडण्याचे प्रत्यक्ष काम करणे.(35)

5) दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्वेक्षण करणे.(50)

6) पल्सपोलिओ कार्यक्रमात सहभाग घेणे.(25)

7) पशुगणना करणे.(20)

8) साक्षरता अभियान कार्यक्रमात सहभाग घेणे.(32)

9) ग्रामसफाई अभियान राबविणे.(11)

10) ग्रामअभियान कार्यक्रमात सहभाग घेणे.(7)

11) दूध तापविणे, भात शिजविणे (सकस आहार योजने अंतर्गत). (5)

12) अल्पबचत योजनेत सहभाग घेणे.(10)

यावरुन असे स्पष्ट होते की, प्राथमिक शिक्षकांना अध्ययन अध्यापना पेक्षा जास्त बोजा अशैक्षणिक कामांचा आहे. शासनाचा कोणताही कार्यक्रम किंवा योजना राबवावयाची असल्यास प्रथम, प्राथमिक शिक्षकांचीच आठवण होते यालाच राष्ट्रीय कामे म्हणून लेबल लावले जाते. साहजिकच या अशैक्षणिक कामांचा शिक्षकाच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर वाईट परिणाम होतो असे संशोधकाचे मत आहे.

त्यासाठी शासनाने प्राथमिक शिक्षकांवर कोणतेही अशैक्षणिक कामे सोपवू नयेत.

प्रश्नावलित प्रश्नक्रमांक 52, मुख्याध्यापक स्वतः दिवसातून किती तास अध्यापण करतात? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.41 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.41**

**मुख्याध्यापकांच्या अध्यापन तासिका**

| अ.न. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | तीन तास | 25 | 32.05 |
| 2) | चार तास | 10 | 12.82 |
| 3) | सहा तास | 20 | 25.64 |
| 4) | आठ तास | 23 | 29.49 |
| | एकूण : | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.41 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दररोज तीन तास अध्यापन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 32.05% आहे. चार तास अध्यापन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 12.82 % आहे. सहा तास अध्यापन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 25.64 % आहे. आठ तास अध्यापन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 29.49 % आहे. वरील कोष्टकावरुन असे स्पष्ट होते की, प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक सरासरी दररोज पाच तास अध्यापन करतात. ही बाब समाधानकारक आहे.

मुख्याधापकांनी अध्यापनाचे काम केले तरच त्यांच्यातील शिक्षक जिवंत राहील व त्यांचा शिक्षणाशी जवळचा संबंध राहील. अगोदर तो ही शिक्षक असावा व नंतर मुख्याध्यापक असावा. प्रशासकीय कामे करीत असताना मुख्याध्यापकांनी आपल्या अध्यापन कार्याकडे सतत लक्ष द्यावे, म्हणजे विद्यार्थ्यांशी त्यांचा सतत संपर्क राहील असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 53, विद्यार्थ्यांसाठी खालीलपैकी कोणते वैयक्तिक उपक्रम घेता ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.42 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.42**

**विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक उपक्रम**

| अ.न. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | हस्ताक्षर स्पर्धा | 78 | 100.00 |
| 02 | चित्रकला स्पर्धा | 68 | 87.18 |
| 03 | रांगोळी स्पर्धा | 68 | 87.18 |
| 04 | वक्तृत्व स्पर्धा | 69 | 88.46 |
| 05 | विज्ञान उपकरण निर्मिती स्पर्धा | 29 | 37.18 |
| 06 | इतर उपक्रम | 32 | 41.03 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.42 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा राबविणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100.00 % आहे. चित्रकला व रांगोळी स्पर्धा राबविणाऱ्या मुख्याध्यापाकांचे प्रमाण 87.18 % आहे. विज्ञान उपकरण स्पर्धा राबविणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 41.03 % आहे.

हस्ताक्षर स्पर्धा राबविण्ऱ्या शाळांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. कारण मुलांना लहानपणापासूनच चांगले लिहिण्यामुळे त्यांच्या हस्ताक्षरात सुधारणा होते. व त्यांचे अक्षर सुवाच्य व सुंदर दिसण्यास हस्ताक्षर स्पर्धेचा उपयोग होतो विद्यार्थ्यामध्ये वैयक्तिक स्वरुपाचे उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण होते. व त्यांना शाळेविषयी आकर्षण निर्माण होते. त्यामुळे प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेत सहशालेय कार्यक्रमांचे आयोजन करावे असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 54, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून किती वेळेस करण्यात येते ? असा विचारण्यात आला

होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.43 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.43**

**विद्यार्थ्यांची आरोग्या तपासणी**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | एकवेळा | 43 | 55.12 |
| 02 | दोनवेळा | 35 | 44.88 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.43 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळेतील गुलांची संख्या आरोग्या तपासणी वर्षातून एकवेळा करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 55.12 % आहे. वर्षातुन दोनवेळा विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 44.88 % आहे.विद्यार्थ्यांची वर्षातून दोन्वेळा आरोग्य तपासणी करुन घेणे विद्यार्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. असे संशोधकांचे मत आहे.

ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्यतपासणी वर्षातून एकवेळा होते तेथील मुख्याध्यापकांनी वर्षातून दोनवेळा आरोग्य तपासणी करुन घ्यावी आरोग्य तपासणीनंतर विद्यार्थास एखादा विकार आढळल्यास मुख्याध्यापकांनी त्यांच्या पालकांना बोलावून त्यांना कल्पना दयावी जेणेकरुन मुलाच्या लहान वयातच उपचार करुन त्याचा विकार दूर करता येईल.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 55, विद्यार्थ्यासाठी खालीलपैकी सामुदायिक स्वरुपाचे कोणते उपक्रम घेता? असा विचारण्यात आला होता. त्याबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.44 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.44**

**विद्यार्थ्यांसाठी सामूदायिक उपक्रम**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | आवार सफाई | 78 | 100.00 |
| 02 | सामुदायिक भोजन | 78 | 100.00 |
| 03 | शालेय बाग तयार करणे | 36 | 46.15 |
| 04 | बालक दिन | 78 | 100.00 |
| 05 | स्वातंत्र्य दिन | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.44 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, विद्यार्थ्यांसाठी आवार सफाई व सामूदायिक भोजन हे सामूदायिक उपक्रम राबविणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100.00 % आहे. शालेय बाग तयार करणे हा सामूदायिक उपक्रम राबविणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 46.15 % आहे. बालक दिन व स्वातंत्र्य दिन साजरा करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100.00 % आहे.

सामूदायिक उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना वाढीस लागते . राष्ट्रीय भावना निर्माण होतात. त्यामुळे प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांनी सामूदायिक स्वरुपाचे कार्यक्रम राबवावेत.

5.07 **भोतिक सुविधा व शालेय परिसर** :-

प्रश्नावलीच्या सहाव्या भागात उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळेमध्ये असणाऱ्या भौतिक सुविधा व शालेय परिसर याविषयी माहिती विचारण्यात आलेली होता. प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 56 पासुन प्रश्न क्रं. 64 पर्यंत भौतिक सुविधा व शालेय परिसर याविषयी मुख्याध्यापकांना प्रश्न विचारण्यात आले होते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 56, शालेय इमारतीच्या प्रकाराविषयी विचारण्या आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडुन प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.45 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.45**

**शालेय इमारतीचा प्रकार**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | पक्की | 31 | 39.74 |
| 02 | अर्धीपक्की | 31 | 39.74 |
| 03 | कच्ची | 12 | 15.38 |
| 04 | टीनशेड | 04 | 5.14 |
| 05 | इमारत नाही | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.45 चे अवलोकन केल असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांना पक्की इमारत असण्याचे प्रमाण 39.74 % आहे. प्राथमिक शाळांची इमारत अर्धीपक्की असण्याचे प्रमाण 39.74 % आहे. प्राथमिक शाळांच्या इमारती कच्ची असण्याच्या शाळांचे प्रमाण 15.38 % आहे. प्रथमिक शाळा टीन शेड मध्ये असण्याचे प्रमाण 5.14 % आहे. उस्मानाबाद तालुक्यातील सर्वच प्राथमिक शाळांना इमारती आहेत.

संशोधकाने दहा प्राथमिक शाळांना भेटी दिल्या असता असे दिसून आले की, नगरपरिषदेच्या शाळेच्या इमारती चांगल्या आहेत. खाजगी शाळांच्या इमारतीमध्ये जागा कमी, विद्यार्थी जास्त अशी परिस्थिती आहे. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या इमारती सुस्थितीत नाहीत.

जि. प. शाळांच्या इमारतीचा दर्जा निकृष्ट आहे. बहुतांशी शाळा जि. प. च्या आहेत. बऱ्याच शाळा टीनशेडमध्ये भरतात.

प्राथमिक शाळांसाठी पक्की व चांगली इमारत असणे फार आवश्यक आहे. जवळपास 60 % शाळांना पक्या इमारती नाहीत. ज्या इमारती आहेत त्यांची अवस्था नाईट आहे.

त्यासाठी प्रशासनाने प्राथमिक शाळांच्या इमारती टिकाऊ, निसर्गरम्य व सुस्थितीत असाव्यात याकडे लक्ष दयावे. त्यांचप्रमाणे शासनाने सर्व प्राथमिक शाळांना पक्की इमारत बांधण्यासाठी अनुदान दयावे असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 57, शालेय इमारत खालीलपैकी कोणाची आहे? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली कोष्टक क्रमांक 5.46 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.46**

**शालेय इमारतीची मालकी**

| अ.न. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | जिल्हा परिषद | 53 | 67.96 |
| 02 | नगरपरिषद | 11 | 14.10 |
| 03 | संस्थेची | 07 | 08.97 |
| 04 | भाड्याने | 07 | 8.97 |
| 05 | इतर | 00 | 0.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.46 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील एकूण प्राथमिक शाळांच्या इमारतीपैकी 67.96% . जिल्हा परिषदेच्या मालकीच्या आहेत. नगर परिषदेच्या मालकीच्या शाळा इमारताचे प्रमाण 14.10 % आहे. खाजगी संस्थेच्या मालकीच्या इमारती असणाऱ्या शाळंचे प्रमाण 8.97 % आहे. शाळेसाठी भाड्याने इमारत असणाऱ्या शाळांचे प्रमाण 8.97 % आहे.

संशोधकांच्या मते, शासनाने प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थावर सोपविली असल्यामुळे, त्यांच्या मालकीच्या इमारतीचे प्रमाण जास्त आहे. जि. प. च्या शाळांचे प्रमाण जास्त आहे, परंतु त्यांच्या इमारतीची देखभाल व्यवस्थित होत नाही.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 58, वर्ग खोल्या पुरेशा आहेत का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.47 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.47**

**वर्गखोल्यांची पर्याप्तता**

| अ.न. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 37 | 47.43 |
| 02 | नाही | 41 | 52.56 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.47 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांना पुरेशा वर्गखोल्या असणाऱ्या शाळांचे प्रमाण 47.43% आहे. पुरेशा वर्ग खोल्या नाहीत अशा प्राथमिक शाळांचे प्रमाण 52.56 % आहे. उस्मानाबाद तालुक्यातील सर्वच शाळांनापुरेशा वर्गखोल्या असणे आवश्यक आहे.

प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट इ.स. 2000 सालापर्यंत साध्य करावयाचे आहे. असे असताना 52.56 % प्राथमिक शाळांना पुरेशा वर्ग खोल्या नाहीत, ही बाब अत्यंत असमाधानकारक आहे. प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत प्रश्नाकडे शासनाने लक्ष दयावे आज ग्रामीण भागातील शाळांच्या वर्गखोल्या इमारत व आसपासचा परिसर अत्यंत निरस, अनाकर्षक असा आहे.त्यामुळे मुलांना शाळेत यावे असे वाटणार नाही.

मुलांना जर शाळेत बसायला व्यवस्थित वर्गखोल्या नसतील तर विद्यार्थी शाळेकडे फिरकणार नाहीत. त्यासाठी

प्रशासनाने सर्व शाळांना पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध करुन दयाव्यात असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 59, शाळेत पुरेसे फर्निचर [ बाक / डेस्क/ टेबल / खुर्ची ] आहे का? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापाकंकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.48 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.48**

**फर्निचरची उपलब्धता**

| अ.न. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 35 | 44.87 |
| 02 | नाही | 43 | 55.13 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.48 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांना पुरेसे फर्निचर असणाऱ्या शाळांचे प्रमाण 44.87 % आहे. प्राथमिक शाळांना पुरेसे फर्निचर नाही अशा शाळांचे प्रमाण 55.13 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, उस्मानाबाद तालुक्यातील 55.13 % प्राथमिक शाळांना फर्निचरची कमतरता आहे. ही बाब असमाधानकारक आहे. प्रशासनाने या सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करावेत असे संशोधकांचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 60, शाळेतील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेविषयी विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.49 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.49**

**पिण्याच्या पाण्याची सोय**

| अ.न. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | हातपंप | 05 | 6.41 |
| 02 | विहिर | 00 | 00.00 |
| 03 | नळयोजना | 43 | 55.13 |
| 04 | कांहीही सोय नाही | 30 | 38.46 |
| 05 | इतर | 00 | 00.00 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.49 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांकडे हातपंपाने पिण्याच्या पाण्याची सोय असणाऱ्या शाळांचे प्रमाण 6.41% आहे. नळयोजनेद्वारे पिण्याच्या पाण्याची सोय असणाऱ्या शाळांचे प्रमाण 55.13 % आहे. विहिर व इतर सोय नाहीत अशा शाळांचे प्रमाण 00.00 % आहे. ज्या शाळांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही अशा शाळांचे प्रमाण 38.46% आहे.

सर्वच प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय असणे अत्यंत आवश्यक आहे. संशोधकाने दहा प्राथमिक शाळांना भेटी दिल्या असता असे दिसुन आले की, जि. प. च्या प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही. खाजगी संस्था व नगरपालिकेच्या शाळांनी पाण्याची सोय केलेली आहे.

जि. प. शाळांच्या मुख्याध्यापकांनी व वरिष्ठ प्रशासनाने या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देऊन, मुलांसाठी पिण्याच्या पाणण्याची सोय करुन द्यावी. त्याचबरोबर समाज व ग्रामशिक्षण समित्यांनी, पिण्याच्या पाण्याची सोय करुन देण्यासाठी प्रयत्न करावेत असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 61, मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोली आहे काय ? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक

मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक कारमांक 5.50 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.50**

**मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था**

| अ.न. | प्रतिसाद स्वरूप | प्रतिसाद संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 34 | 43.59 |
| 02 | नाही | 44 | 56.41 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.50 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकासाठी खोली असणाऱ्या शाळांचे प्रमाण 43.59 % आहे. ज्या प्राथमिक शाळांना मुख्याध्यापकासाठी खोली उपलब्ध नाही अशा शाळांचे प्रमाण 56.41 % आहे. ही बाब असमाधानकारक आहे.

सर्वच मुख्याध्यापकांना त्यांची शैक्षणिक व प्रशासकीय कामे करण्यासाठी स्वतंत्र खोलीची आवश्यकता आहे. जेणेकरुन मुख्याध्यापक आपले काम व्यवस्थित पार पाडू शकतील असे संशोधकांचे मत आहे.मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोली बांधण्यासाठी समाजातील धनिक लोकांकडून देणगी घ्यावी, किंवा त्यांच्याकडून खोली बांधून घ्यावी. त्याचप्रमाणे समाजातील विविध स्तरातील लोकांकडून देणगी घेऊन, मुख्याध्यापकांसाठी खोली बांधता येईल, त्यासाठी प्रशासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 62, शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली आहे काय ? असा विचारण्यात आली होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडुन प्राप्त झालेली माहिती कोष्ट क्रमांक 5,51. मध्ये देण्यात आलेली आहे.

### कोष्टक क्रमांक 5.51

### शिक्षकांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था

| अ.न. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 15 | 19.23 |
| 02 | नाही | 63 | 80.77 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.51 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांना शिक्षक खोली असणाऱ्या शाळांचे प्रमाण 19.23 % आहे. ज्याप्राथमिक शाळांना शिक्षक खोली नाही अशा शाळांचे प्रमाण 80.77 % आहे.

सर्वच प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली असणे आवश्यक आहे. शिक्षकांना रिकामा तास असेल तेंव्हा शिक्षक त्याखोलीत बसून पुढील तासाची तयारी करु शकतील. त्यासाठी प्रशासनाने शासनाकडून अनुदान मिळवून किंवा समाजातून देणगी घेऊन शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली उपलब्ध करावी, असे संशोधकांचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्र. 63, शाळेकडे खालीलपैकी कोणता शैक्षणिक साधने उपलब्ध आहेत ? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.52 मध्ये देण्यात आलेली आहे.

### कोष्टक क्रमांक 5.52

### शाळेकडील उपलब्ध शैक्षणिक साधने

| अ.न. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | दूरदर्शन संच | 25 | 32.05 |
| 02 | रेडिओ | 30 | 38.46 |

| अ.न. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 03 | टू-इन-वन | 38 | 48.72 |
| 04 | गणितपेटी | 41 | 52.56 |
| 05 | विज्ञानपेटी | 48 | 61.54 |
| 06 | तक्ते | 57 | 73.07 |
| 07 | नकाशे | 64 | 82.05 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.52 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील ज्या प्राथमिक शाळांकडे दूरदर्शन संच उपलब्ध असणाऱ्या शाळांचे प्रमाण 32.05 % आहे. टू-इन-वन उपलब्ध असणाऱ्या शाळांचे प्रमाण 48.72 % आहे. गणितपेटी उपलब्ध असणाऱ्या शाळांचे प्रमाण 52.56% आहे. विज्ञानपेटी असणाऱ्या शाळांचे प्रमाण 61.54% आहे. तक्ते असणाऱ्या शाळांचे प्रमाण 73.07 % आहे. नकाशे असणाऱ्या शाळांचे प्रमाण 82.05 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांशी शाळांना शैक्षणिक साधने उपलब्ध आहेत. त्या शाळांनी योग्य तेथे वापर केल्यास मुलांच्या त्या त्या विषयातील संकल्पना स्पष्ट होतील व त्यांना शाळेविषयी आवड निर्माण होईल. त्यासाठी सर्वच शाळांना पुरेशी शैक्षणिक साधने प्रशासनाने उपलब्ध करुन दयावीत, असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रं. 64, शाळेला स्वतः चे क्रिडांगण आहे काय? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.53 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.53**

**शाळेच्या क्रिडागंणाची सोय**

| अ.न. | प्रतिसाद स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 40 | 51.28 |
| 02 | नाही | 38 | 48.72 |
| | एकूण :- | 78 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.53 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांना क्रिडांगण असणाऱ्या शाळेचे प्रमाण 51.28 % आहे. ज्या प्राथमिक शाळांना क्रिडांगण नाही अशा शाळांचे प्रमाण 48.72 % आहे. सर्वच प्राथमिक शाळांना क्रिडांगण असणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास हा त्याच्या शारिरीक प्रकृतीवर अवलंबून असतो. जर प्रकृती चांगली असेल तर विद्यार्थ्याचे मन चांगले राहील, बुध्दी चांगली राहील. यासाठी सर्व मुलांना खेळ आवश्यक आहे. त्यासाठी क्रिडांगण आवश्यक आहे. क्रिडांगणच नसेल तर खेळ कोठून येणार ? याचा शैक्षणिक प्रशासकांनी विचार केला पाहिजे. त्याचबरोबर शासनानेही याचा विचार करावा.व सर्व प्राथमिक शाळांना क्रिडांगण उपलब्ध करुन दयावे त्याचबरोबर समाजातील दानशूर व्यक्तीकडून शाळेला क्रिडांगणसाठी जमीन मिळवावी त्यासाठी मुख्याध्यापकांनी सतत समाजाशी संपर्क ठेवावा व समाजाकडून मदत मिळवावी असे संशोधकाचे मत आहे.

5.08 **प्रशासनाच्या बाबतीत मुख्याध्यापकांनी दिलेली माहिती** :-

प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाच्या संदर्भात मुख्याध्यापकांना आणखी माहिती द्यावी असे वाटत असेल तर ती सोबतच्या कोऱ्या कागदावर द्यावी अशा स्वरुपाचा प्रश्न प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक 65 मध्ये विचारण्यात आला होता. त्याबाबतच्या प्रतिसाद मुख्याध्यापकांनी खालीलप्रमाणे दिलेला आहे. (कंसात वारंवारिता )

1) वरिष्ठ प्रशासनाकडून शिक्षक व कर्मचाऱ्यांची आर्थिक अडवणूक केली जाते. उदा. : शिक्षकांचे मासिक वेतन वेळेवर होत नाही. पुरवणी बिलांसाठी बराच कालावधी लागतो. (65)

2) शिक्षकांच्या वैद्यकीय रजा लवकर मान्य केल्या जात नाहीत (25)

3) शिक्षकांच्या वार्षिक वेतनवाढी वेळेवर कार्यवाहीस्तव पाठवून सुध्दा वर्षभर मान्य होत नाहीत. (60)

4) शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांमध्ये समाजाचा सहभाग मिळावा (10)

5) शासनाने एकाच गावात किंवा भागात असंख्य शाळांना मान्यता देऊ नये. (25)

6) शिक्षकांचे गैरसोयीचे स्थलांतर करु नये. गैरसोयीचे स्थलातंर केल्यामुळे शिक्षकांमध्ये नैराश्याची भावाना निर्माण होते. (35)

केंद्रप्रमुखाची मुलाखत

**5.09 माहितीचे वर्गीकरण व विशदीकरण**

प्रास्ताविक मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीत विचारलेल्या प्रश्नांचे व दिलेल्या माहितीचे विश्लेषण व विशदीकरण यापुर्वी केलेले आहेच. केंद्रप्रमुखांची नावे व मुख्यालयाचा पत्ता परिशिष्ट " फ " देण्यात आली आहेत.

मुलाखतीत संशोधकाने केंद्रप्रमुखांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेविषयी प्रश्न विचारलेला होता. प्रतिसादक केंद्ररप्रमुखाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.54 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.54**

**केंद्रप्रमुखांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | बी. ए. बी. एड. | 06 | 42.85 |
| 02 | बी. एस्सी. बी. एड. | 04 | 28.57 |
| 03 | एम. ए. बी. एड. | 02 | 14.24 |
| 04 | एम. ए. एम. एड. | 02 | 14.24 |
| | एकूण | 14 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.54 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, बी.ए.बी.एड. असणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 42.85 % आहे. बी.एस्सी.बी.एड. असणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 28.57% आहे. एम.ए.बी.एड. असणाऱ्या केंद्रप्रमुखाचे प्रमाण 14.24% आहे. एम.ए.एम.एड. असणाऱ्या केंद्रप्रमुखाचे प्रमाण 14.24% आहे.

शाळातील पटनोंदणी वाढविण्यासाठी कोणत्या योजना राबविता? असा प्रश्न संशोधकाने विचारलेला होता. प्रतिसादक

केंद्रप्रमुखाकडून प्राप्त झालेली कोष्टक क्रमांक 5.55 मध्ये देण्यात आली.

**कोष्टक क्रमांक 5.55**

**शाळेतील पटनोंदणी वाढविण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या योजना**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01) | पटनोंदणी संदर्भात सर्वेक्षण करणे | 14 | 100.00 |
| 02) | पटनोंदणी अहवाल तयार करणे | 10 | 71.42 |
| 03) | शाळानिहाय सरासरी उपस्थिती | 05 | 35.71 |
| 04) | शाळा मध्येच सोडुन जाणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती ठेवणे | 12 | 85.71 |
| 05) | कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती ठेवणे | 09 | 64.44 |
| 06) | पालकसभा घेणे | 12 | 85.71 |
| 07) | इतर योजना | 00 | 0.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.55 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की प्राथमिक शाळेमध्ये पटनोंदणी संदर्भात सर्वेक्षण राबविण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 100.00 %आहे. पटनोंदणी अहवाल तयार करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 71.42% आहे. शाळानिहाय सरासरी उपस्थिती दाखविणारे तक्ते ठेवणाऱ्यांचे प्रमाण 35.71 % आहे. शाळा मध्येच सोडुन जाणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती ठेवणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 85.71 % आहे. कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती ठेवणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 64.44 % आहे. पालकसभा आयोजित करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 85.71% आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की , पटनोंदणी संदर्भात सर्वेक्षण राबविण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण जास्त आहे. शाळा सुरु होणाऱ्या महिन्यात (जून –जुलै) सुटट्या मध्ये नोंदणी सर्वेक्षण योजना पूर्णपणे शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या मदतीने केंद्रप्रमुख राबवितात ही समाधानकारक बाब आहे.

शाळेतील पटनोंदणी वाढविण्यासाठी सर्वच योजना केंद्रप्रमुखांनी व्यवस्थितपणे राबवाव्यात जेणेकरुन 6–14 या

वयोगटातील कोणताही विद्यार्थी प्राथमिक शिक्षणापासुन वंचित राहणार नाही, असे संशोधकांचे मत आहे.

गळती रोखण्यासाठी कोणत्या योजना राबविता ? असा प्रश्न संशोधकाने केंद्रप्रमुखांना विचारलेला होता. प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडुन प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.56 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.56**

**गळती थांबविण्यासाठी योजना**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01) | शालेय पोषण आहार योजना | 14 | 100.00 |
| 02) | गणवेश व लेखन साहित्य वाटप | 10 | 71.44 |
| 03) | पुस्तकपेढी | 07 | 50.00 |
| 04) | मुलींना उपस्थिती भत्ता | 12 | 85.71 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.56 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते, की प्राथमिक शाळेमध्ये शालेय पोषण आहार येजना राबविणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 100.00 % आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गणवेश व लेखन साहित्य वाटप योजना राबविणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 71.44 % आहे. . पुरतकपेढी योजना राबविणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 50.00 % आहे. मुलींसाठी उपस्थिती भत्ता योजना राबविणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 85.71 % आहे.

यावरुन असे स्पष्ट हेता की प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. विशेषतः शालेय पोषण आहार योजना सर्वात जास्त प्रमाणात राबविली जाते. मुलांना शाळेत दुपारचे जेवण दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे उपस्थितीत वाढ होते. असे केंद्रप्रमुखांचे मत आहे. दुपारच्या जेवणाच्या आशेने बरेच विद्यार्थी शाळेत येतात त्यामुळे या विद्यार्थ्यांची गळती बरीच कमी झालेली. आहे.

परंतु विशेषतः ग्रामीण भागतील विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना संपूर्णपणे राबविणे आवश्याक आहे. ग्रामीण भागातील

ब-याच विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती भक्कम नसल्यामुळे ते स्वतः पुस्तके विकत घेउ शकत नाहीत. त्यासाठी पुस्तकपेढी योजना केंद्रप्रमुखांनी सर्व प्राथमिक शांळामध्ये प्रभावी पणे राबवावी. जेणे करुन विद्यार्थ्यामध्ये होणारी गळती थाबंविता येईल

शिक्षक पाठटाचण काढतात काय ? असा प्रश्न संशोधकाने केंद्रप्रमुखांना विचारला होता.

प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झालेली कोष्टक क्रमांक 5.57 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.57**

**शिक्षकांच्या पाठटाचणाविषयी**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01) | होय | 10 | 71.42 |
| 02) | नाही | 04 | 28.58 |
| | एकूण | 14 | 100.00 |

वरील कोष्टक क्र. 5.57 निरीक्षण केले असता असे दिसून येते की केंद्रप्रमुखांच्या मते पाठटाचण न काढण्याऱ्या शिक्षकांचे प्रमाण 71.42 % आहे. पाठटाचण न काढण्याऱ्या शिक्षकांचे प्रमाण 28.58 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे पाठटाचण काढण्याचे प्रमाण जास्त आहे. दररोज पाठटाचण काढल्यामुळे शिक्षकांस जो घटक , विषय शिकवयाचा आहे. त्याविषयी पुर्वकल्पना येते व तो त्याविषयी तयारी चांगल्या प्रकारे करु शकातो . त्यामुळे पाठटाचण काढण्याऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त आहे, ही बाब समाधानकारक आहे.

जे शिक्षक पाठटाचण काढत नाहीत त्यांना प्रशासनाने तोंडी सूचना देऊन किंवा लेखी देऊन, पाठटाचण काढण्यास भाग पाडावे, असे संशोधकांचे मत आहे.

शिक्षक नियमित शाळेत येतात याची पडताळणी करता काय? असा प्रश्न संशोधकाने केंद्रप्रमुखांना विचारला होता प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.58 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.58**

**शिक्षकांच्या नियमित उपस्थितीबाबत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01) | होय | 08 | 57.14 |
| 02) | नाही | 06 | 42.86 |
| | एकूण | 14 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.58 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, शिक्षकांच्या नियमित शाळेत येतात याची पडताळणी करण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 57.14 % आहे. शिक्षकांच्या नियमित उपस्थितीबाबत पडताळणी न करण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 42.86 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, शिक्षक नियमीत शाळेत येतात याची पडताळणी करण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 57.14 % आहे. हे प्रमाण जास्त आहे. ही बाब समाधानकारक आहे. ज्या केंद्रांमध्ये प्राथमिक शाळा जवळ आहेत व वाहनांची सोय आहे. तेथे केंद्रप्रमुखशिक्षकांच्या नियमित शाळेत येतात याची पडताळणी करु शकतात. ज्या केंद्रामध्ये शाळा दूर-दूर आहेत त्याठिकाणी शिक्षक नियमित शाळेत येतात किंवा नाही. याची पडताळणी केंद्रप्रमुखांना करणे आवश्यक आहे, असे संशोधकांचे मत आहे.

शाळांना भेट दिल्यानंतर दिलेल्या सुचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवता काय? असा प्रश्न संशोधकाने केंद्रप्रमुखांना विचारला होता. केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.59 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.59**

**शिक्षकांच्या दिलेल्या सुचनांच्या नोंदीबाबत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01) | होय | 11 | 78.57 |
| 02) | नाही | 03 | 21.43 |
| | एकूण | 14 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.59 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, शाळांना भेट दिल्यानंतर दिलेल्या सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 78.57 % आहे.

शाळांना भेट दिलेल्या सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत न ठेवण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 21.43 % आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, केंद्रप्रमुख शाळंना भेट देतात व शिक्षक, मुख्याध्यापक यांना शैक्षणिक बाबीवीषयी सुचना देतात व त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवतात यांचे प्रमाण जास्त आहे. ही बाब समाधानकारक आहे.
दिलेल्या सूचनांचे पालन झाले किंवा नाही हे केंद्रप्रमुखांनी पुढच्या भेटीच्या वेळी पाहावे म्हणजे प्रशासन कार्यक्षन राहील व शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या कामामध्ये सुधारणा घडुन येईल असे संशोधकांचे मतआहे.

शाळा तपासणीनंतर शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याशी चर्चा करता काय? असा प्रश्न संशोधकाने केंद्रप्रमुखांना विचारला होता. प्रतिसादक केंद्रप्रमुखाकडून विचारला होता. प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.60 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.60**

**शाळातपासणीनंतर चर्चा**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01) | होय | 14 | 100.00 |
| 02) | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण | 14 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.60 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शाळा तपासणीनंतर शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याशी चर्चा करण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 100.00 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, शाळा तपासणीनंतर सर्वच केंद्रप्रमुख शिक्षक व मुख्याध्यापकांशी चर्चा करुन त्यांच्या समस्या सोडवितात ही बाब समाधानकारक आहे.

विद्यार्थ्यांचे किमान अध्ययन क्षमता वरील प्रभुत्वाची चाचणी घेऊन प्रत्येक शिक्षकांचे मूल्यमापन करता काय ? असा प्रश्न संशोधकाने केंद्रप्रमुखांना विचारला होता. प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.61 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.61**

**शिक्षकांचे मूल्यमापन**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01) | होय | 12 | 85.71 |
| 02) | नाही | 02 | 14.29 |
| | एकूण | 14 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.61 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, विद्यार्थ्यांच्या किमान अध्ययनक्षमतेच्या आधारे शिक्षकांचे मूल्यमापन करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 85.71 % आहे. विद्यार्थ्यांच्या किमान अध्ययन क्षमतेवरुन शिक्षकांचे मुल्यमापन न करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 14.29 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की विद्यार्थ्यांनी किमान अध्ययन क्षमता कितपत आत्मसात केल्या आहेत यावरुन शिक्षकांचे मुल्यमापन केंद्रप्रमुख करतात ही बाब समाधानकारक आहे. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त अध्ययन क्षमता आत्मसात करण्यासाठी शिक्षकांचे अध्यापन प्रभावी व्हावे. अध्यापनामध्ये शैक्षणिक साहित्याचा उपयोग करावा. शिक्षकांचे केंद्रप्रमुखांनी मूल्यमापन केल्यानंतर शिक्षकांना मार्गदर्शन करावे, असे संशोधकांचे मत आहे.

समूहातील शाळांना महिन्यातून किती भेटी देता? असा प्रश्न संशोधकाने विचारला होता. प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.62 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.62**

**समूहातील शाळांना भेटी**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | एक | 03 | 21.43 |
| 02 | दोन | 08 | 57.14 |
| 03 | तीन | 03 | 21.43 |
| | एकूण | 14 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.62 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, समूहातील शाळांना महिन्यातुन एकवेळा भेट देण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 21.43 % आहे. समूहातील शाळांना महिन्यातून दोनवेळा भेट देणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 57.14 % आहे. समूहातील शाळांना महिन्यातून तीनवेळा भेट देणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 21.43 % आहे.

यावरुन असे स्पष्ट दिसून होते की महिन्यातून प्रत्येक शाळेस दोन भेटी देणाऱ्या केंद्रप्रमुखांची संख्या जास्त

आहे.महिन्यातून प्रत्येक शाळेस दोन भेटी दिल्यास शाळेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामांचा केंद्रप्रमुखांना आढावा घेता येतो. शालेय अडचणी जाणुन घेऊन, त्यासोडविण्यासाठी उपाययोजना करता येते. त्यासाठी प्रत्येक केंद्रप्रमुखांनी प्रत्येक शाळेला किमान दोन वेळा भेट दयावी असे संशोधकांचे मत आहे.

आपण आठवड्यातून किती तास अध्यापन करता? असा प्रश्न संशोधकांने विचारला होता. प्रतीसादक केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5. 63 मध्ये आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.63**

**अध्यापन तासिका बाबत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | चार तास | 10 | 71.43 |
| 02 | सहा तास | 04 | 28.57 |
| | एकूण | 14 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.63 चे निरीक्षण केले असता, आठवड्यातून चार तास अध्यापन करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 71.43 % आहे. आठवड्यातून सहा तास अध्यापन करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 28.57 % आहे.

यावरुन स्पष्ट होते की, जास्तीत जास्त केंद्रप्रमुख शासनाने ठरवून दिलेल्या आठवड्यातील चार तास तासिका अध्यापनाचे कार्य करतात. केंद्रप्रमुख शैक्षणिक व प्रशासकीय काम पाहत असतानाच अध्यापन कार्याकडेही लक्ष देतात ही बाब समाधानकारक आहे. केंद्रप्रमुखांच्या अध्यापन व त्यांच्या अनुभवाचा निश्चितच विद्यार्थ्यांना फायदा होईल, असे संशोधकांचे मत आहे.

पूर्वनियोजित भेटीच्या वेळी शिक्षकांची कोणती कामे पडताळून पाहता ? असा प्रश्न संशोधकाने केंद्रप्रमुखांना विचारला होता. प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.64 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.64**

**केंद्रप्रमुखांकडून शिक्षकांच्या कामाची पडताळणी**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | अध्यापनपूर्वतयारी | 12 | 85.71 |
| 02 | अध्यापनकार्य | 14 | 100.00 |
| 03 | शैक्षणिक साधनांचा वापर | 09 | 64.29 |
| 04 | विद्यार्थ्यांचा प्रतिसाद | 08 | 57.14 |
| 05 | गृहपाठ | 10 | 71.43 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.64 चे निरीक्षण केले असता दिसून येते की पूर्व नियोजित भेटीच्या वेळी शिक्षकांची पुर्वतयारी पाहणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 85.71 % आहे. पूर्वनियोजीत भेटीच्यावेळी शिक्षकांचे प्रत्यक्ष अध्यापन कार्य पाहणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 100.00 % आहे. अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर केला जातो किंवा नाही पाहणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 64.29 % आहे. शिक्षक अध्यापन करीत असतांना त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कितपत आहे, हे पाहणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 57.14 % आहे. पूर्वनियोजित भेटीच्यावेळी, विद्यार्थ्यास गृहपाठ तपासून दिला जातो किंवा नाही या गोष्टी पाहणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 71.43 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, केंद्रप्रमुख शिक्षकांच्या अध्यापन कार्याकडे जास्तीत जास्त लक्ष देतात. शिक्षकांच्या अध्यापनावर विद्यार्थ्यांचा व शाळेचा विकास अवलंबून आहे. त्यामुळे केंद्रप्रमुख शिक्षकांच्या अध्यापन व अध्यापनाशी निगडीत सर्वच बाबींकडे लक्ष देतात. ज्यामुळे शिक्षकांचे अध्यापन प्रभावी होते, ही बाब समाधानकारक आहे.

प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांसाठी कोणते कार्यक्रम घडवून आणता? असा प्रश्न संशोधकांने केंद्रप्रमुखांना विचारला होता. प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.65 मध्ये देण्यात आलेली आहे.

## कोष्टक क्रमांक 5.65

## दर्जेदार प्राथमिक शिक्षणाचे प्रयत्न

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | चर्चासत्र | 12 | 85.71 |
| 2 | शिबिरे | 10 | 71.43 |
| 3 | गटसंम्मेलन | 14 | 100.00 |
| 4 | कृतिसत्र | 08 | 57.14 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.65 चे निरीक्षण केले असता दिसून येते की, शिक्षकांसाठी चर्चासत्र आयोजित करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 85.71 % आहे. शिबिरे आयोजित करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 71.43 % आहे. प्राथमिक शिक्षणांचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांसाठी गटसम्मेलन आयोजित करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 100.00 % आहे. शिक्षकांसाठी कृतीसत्र आयोजित करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 57.14 % आहे.

यावरुन स्पष्ट होते की, प्राथमिक शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शिक्षकांसाठी गटसम्मेलन आयोजित करणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण जास्त आहे. या गटसम्मेलनातून शिक्षकांच्या अध्यापन विषयक विविध समस्यांवर चर्चा करुन, उपाय शोधले जातात ही बाब समाधानकारक आहे.

प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न होत आहेत. तरी परंतु यापेक्षा जास्त प्रयत्न होणे आवश्याक आहे. त्यासाठी प्रशासनाने प्राथमिक शिक्षणाच्या शैक्षणिक व प्रशासकीय बाबींकडे बारकाईने लक्ष दयावे. असे संशोधकांचे मत आहे.

5.10 शिक्षणविस्तार अधिकारी यांची मुलाखत

**माहितीचे वर्गीकरण व विशदीकरण**

## प्रास्ताविक :–

मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीत विचारलेल्या प्रश्नाचे व केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीतील मुद्यांचे विश्लेषण व विशदीकरण यापूर्वी केलेले आहेच.शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना मुलाखतीत जे काही इतर प्रश्न विचारले. अशा प्रश्नांचे वर्गीकरण व वेशदीकरण येथे होण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधकाने मुलाखतीसाठी 7 शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची नांवे परिशिष्ट " ग " मध्ये देण्यात आली आहेत.

संशोधकांने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेविषयी प्रश्न विचारलेला होता. त्याबाबतची माहिती कोष्टक क्रमांक 5.66 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.66**

**शिक्षणविस्तार अधिकारी यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | एस. एस. सी. ज्यु. पी. टी. सी. | 02 | 28.58 |
| 02 | एस. एस. सी. डी. एड्. | 01 | 14.28 |
| 03 | बी. ए. डी. एड. | 02 | 28.58 |
| 04 | बी. ए. बी. एड. | 01 | 14.28 |
| 05 | बी. एस्सी. बी. एड. | 01 | 14.28 |
| | एकूण | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.66 चे निरीक्षण केले असता दिसून येते की, एस. एस. सी. ज्यु. पी. टी. सी. शैक्षणिक

पात्रता असणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 1८.28 % आहे. एस. एस. सी. डी. एड. असणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रनाण 14.28 % आहे. बी. ए. डी. एड. असणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.58 % आहे. बी. ए. बीएड. असणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 14.28 % आहे. बी. एस्सी. बी. एड् . असणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 14.28 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेत सुसूत्रता दिसत नाही . शिक्षणविस्तार अधिकाऱ्याची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता कमीतकमी बी. ए. बी. एड्. किंवा बी. एस्सी. बी. एड्. असावी असे संशोधकांचे मत आहे.

संशोधकाने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या प्रशासन अनुभवाविषया माहिती विचारली होती. त्यांच्या प्रशासनाचा अनुभव खालील कोष्टक क्रमांक 5.67 मध्ये संकलित केलेला आहे.

**कोष्टक क्रमांक 5.67**

**शिक्षण विस्तार अधिकारी यांचा प्रशासन अनुभव**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | 05 | 2 | 28.57 |
| 02 | 10 | 2 | 28.57 |
| 03 | 15 | 3 | 42.85 |
| | एकूण :- | 7 | 100.00 |

सरासरी अनुभव :- 10 वर्षे

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.67 चे निरीक्षण केले असता दिसून येते की, 5 वर्षे प्रशासनाचा अनुभव असणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.57 % आहे. 10 वर्षे प्रशासनाचा अनुभव असणाऱ्या शिक्षण विस्तार

अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.57 % आहे. 15 वर्षे प्रशासनाचा अनुभव असणाऱ्या शिक्षण विस्तार42.85 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की शिक्षणविस्तार अधिकारी यांना प्रशासनाचा सरासरी अनुभव 10 वर्षे आहे. ही बाब समाधानकारक आहे.

संशोधकांने शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांना त्यांच्या बीट अंतर्गत येणाऱ्या शाळांच्या संख्येविषयी प्रश्न विचारला होता. शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांकडून मिळालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.68 मध्ये संकलित केलेले आहे.

**कोष्टक क्रमांक 5.68**

**बीट अंतर्गत येणाऱ्या शाळांची संख्या**

| अ.नं. | बीटचे नांव | प्रतिसाद संख्या (शाळांची संख्या ) | प्रतिसाद शेकडा प्रमाण (शाळंचे ) |
|---|---|---|---|
| 01 | उस्मानाबाद ग्रामीण | 20 | 16.13 |
| 02 | तेरणा नगर | 18 | 14.52 |
| 03 | येडशी | 17 | 13.70 |
| 04 | तेर | 18 | 14.52 |
| 05 | कांमगाव | 20 | 16.34 |
| 06 | बावी | 16 | 12.90 |
| 07 | बेंबळी | 15 | 12.09 |
| | एकूण | 124 | 100.00 |

बीटमधील सरासरी शाळांची संख्या :- 18

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.68 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उस्मानाबाद तालुक्यातील सात बीटमधील

शाळंच्या संख्येचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे. उस्मानाबाद ग्रामीण 16.13 % तेरणानगर 14.52 % , येडशी 13.07 %, तेर 14.52%, कामेगांव 16.34%, बावी 12.90 %, बेबंळी 12.09 %.

यावरुन स्पष्ट होते की प्रत्येक बीटमध्ये सरासरी 18 प्राथमिक शाळा आहेत. ही शाळांच्या संख्या शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामांच्या दृष्टीने योग्य आहे. बीटअंतर्गत असणाऱ्या प्रा. शाळांची संख्या ठराविक प्रमाणात असल्यामुळे शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना सोयीचे जाते.

पंचायत समिती, उस्मानाबाद येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयातून माहिती मिळविली असता असे निदर्शनांस आले की, उस्मानाबाद तालुक्यातील शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांची अजून तीन पदे रिक्तआहेत तरी गटशिक्षणाधिकाऱ्यांनी ही तीन पदे लवकरात लवकर भरण्यासाठी पाठपुरावा वरिष्ठांकडे करावा असे संशोधकांचे मत आहे.

संशोधकांने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना ' शिक्षकांच्या बदल्याबाबत योग्य शिफारस करता काय? असा प्रश्न विचारला होता. प्रतिसादक विस्तार अधिकाऱ्या कडुन प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.69 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.69**

**शिक्षकांच्या बदल्याबाबत शिफारशीचे स्वरुप**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 04 | 57.14 |
| 02 | नाही | 03 | 42.86 |
| | एकूण | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.69 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षकांच्या बदल्याबाबत शिफारस करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 57.14 % आहे. शिक्षकांच्या बदल्याबाबत शिफारस न करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 42.86 % आहे.

शिक्षकांच्या बदल्याबाबत शिफारस करणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 57.14 % आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, शिक्षकांच्या बदल्याबाबत विस्तार अधिकाऱ्यांचे मत हे महत्वाचे आहे. कारण शिक्षकांचा व विस्तार अधिकाऱ्यांच्या सतत संपर्क येतो. त्यामुळे विस्तारअधिकाऱ्यांना शिक्षकांच्या अडचणी माहित असल्यामुळे ते बदल्याबाबत योग्य तीच शिफारस करतात असे संशोधकाचे मत आहे.

शाळागृह व साहित्या दुरुस्तीबाबत शिफारस करता काय? असा प्रश्न संशोधकाने शिक्षण विस्तार अधिकाऱ्याला विचारला होता. प्रतिसादक शिक्षण विस्तर अधिकाऱ्यांकडून प्राप्त झलेली माहिती कोष्टक क्रमांक 5.70 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.70**

**साहित्यदुरुस्तीबाबत शिफारस**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 05 | 71.43 |
| 02 | नाही | 02 | 28.57 |
| | एकूण:- | 07 | 100.00 |

वरील कोष्टक क्रमांक 5.70 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की शाळागृह व साहित्य दुरुस्तीबाबात शिफारस करणऱ्या शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 71.43 %. शाळागृह व साहित्य दुरुस्तीबाबत शिफारस न करणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.57 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, शाळागृह व साहित्यदुरुस्तीबाबत शिफारस करणाऱ्या शिक्षण अधिकाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. प्राथमिक शाळांची शैक्षणिक व प्रशासकीय अशा दोन्ही प्रकारच्या कामाची जबाबदारी विस्तार अधिकाऱ्यांची आहे. त्यामुळे शाळेला येणाऱ्या अडचणीबाबत शिक्षणविस्तार अधिकारी आपल्या वरिष्ठांना त्याबाबत कळवितात.

सर्व प्राथमिक शाळांसाठी पुरेसे शिक्षक आहेत का? असा प्रश्न संशोधकाने शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांना विचारला होता. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडुन मिळालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.71 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.71**

**पुरेशा शिक्षकाबाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 04 | 57.14 |
| 02 | नाही | 03 | 42.86 |
| | एकूण:- | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.71 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्राथमिल शाळांसाठी पुरेसे शिक्षक आहेत असे व्यक्त करणाऱ्या शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 42.86 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की पुरेसे शिक्षक असणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 57.14 % आहे. ही बाब असमाधानकारक आहे.

सर्वांसाठी प्राथमिक शिक्षणाचे ध्येय इ. स. 2000 पर्यंत पुर्ण करावयाचे असताना, आज जवळपास 40 % शाळांना शिक्षक नाहीत. शिक्षकच नसेल तर प्राथमिक शिक्षणाचे ध्येय कसे साध्य होणार !.त्यासाठी प्रशासनाने सर्वच प्राथमिक शाळां साठी पुरेसे शिक्षक उपलब्ध करुन दयावेत व नवीन शिक्षकांच्या नेमणुका कराव्यात.प्राथमिक शिक्षणाची होणारी हेळसांड थांबवावी असे संशोधकाचे मत आहे.

" शाळा भेटीच्या वेळी ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांना, सदस्यांना, भेटता काय? असा प्रश्न संशोधकाने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना विचारला होता. प्रतिसादक शक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.72 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.72**

**ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांची चर्चा**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 02 | 28.57 |
| 02 | नाही | 05 | 71.43 |
| | एकूण:- | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.72 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, शाळा भेटीच्या वेळी ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांना व सदस्यांना भेटणाऱ्या विस्तारअधिकाऱ्यांचे प्रमाण 28.57 % .

शाळा भेटीच्या वेळी ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांना व सदस्यांना भेटणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 71.43 % आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांना व सदस्यांशी चर्चा न करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांशी बातचीत करत असताना बहुतांशी शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या मते, ग्रामीण भागात जेव्हां शाळा भेटीर जातो. त्यावेळेस ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व सदस्य त्यांच्या वैयक्तिक कामामुळे शाळेच्या कामांसाठी वेळ देत नाहीत व भेटण्यासाठी अनुत्सुक असतात त्यामुळे त्यांच्या भेटी होत नाहीत. ग्राममशिक्षण समिती ही ग्रामीण भागात खालच्या स्तरावर काम करणारी आहे. प्रशासनाने या समितीचे सतत सहकार्य घ्यावे व शाळेच्या समश्या सोडविण्यासाठी समाजाचे सहकार्य मिळवावे असे संशोधकांचे मत आहे.

समाजाचा शिक्षणामध्ये सहभाग वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न करता ? असा प्रश्न संशोधकाने शिक्षणविस्तार अधिकाऱ्याला विचारला होता. प्रतिसादक शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांकडुन मिळालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.73 मध्ये देण्यात आली आहे.

### कोष्टक क्रमांक 5.73

### समाजाचे शिक्षणामध्ये सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | शैक्षणिक उठाव | 05 | 71.43 |
| 02 | शिक्षक-पालक संघ | 06 | 85.77 |
| 03 | मातृप्रबोधन | 04 | 57.14 |
| 04 | जाणीव जागृती | 03 | 42.86 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.73 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, समाजाचा शिक्षणामध्ये सहभाग वाढविण्यासाठी शिक्षणविस्तार अधिकारी वेगवेगळ्या योजना राबवितात समाजाचा शिक्षणामध्ये सहभाग वाढविण्यासाठी शैक्षणिक उटाव योजना राबविणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 71.43 % आहे. शिक्षक पालक संघ स्थापन करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 85.77 % आहे. विद्यार्थ्यांच्या मातांसाठी, मातृप्रबोधन योजना राबविणाऱ्या शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 57.14 % आहे.

ग्रामीण भागातील पालकामध्ये व समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 71.43 % आहे. शिक्षक पालक संघ स्थापन करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण ग्रामीण भागातील पालकांमध्ये व समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी ' जाणीव जागृती ' योजना राबविण्याऱ्या शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 42.86 % . आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की विशेषतः ग्रामीण आगातील प्राथमिक शिक्षणामध्ये समाजाचा सहभाग वाढविण्यासाठी शिक्षण विस्तार अधिकारी विवध योजना राबवितात ही बाब समाधानकारक आहे.या योजना प्रशासनाने जाणीवपुर्वक राबविल्यास ग्रामीण भागातील शिक्षणाचे प्रमाण वाढेल त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षणातील गळती व स्थगिती थांबविण्यास मदत होईल, असे संशोधकाचे मत आहे.

गटसंम्मेलनात शिक्षकांना मार्गदर्शन करता काय? असा प्रश्न संशोधकांने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना विचारला होता ? प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.74 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमाक 5.74**

**गटसंम्मेलनात शिक्षकांना मार्गदर्शन**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 07 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.74 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, गटसंम्मेलनात शिक्षकांना मार्गदर्शन करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 100.00 % आहे. ही बाब अत्यंत समाधानकारक आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, बीटमधील सर्वच शाळांच्या केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक यांना शैक्षणिक व प्रशासकीय स्वरुपांचे मार्गदर्शन करण्याचे काम महत्वाचे काम शिक्षण विस्तार अधिकारी करतात.

मार्गदर्शन करीत असल्यास कोणत्या स्वरुपाचे मार्गदर्शन करता? असा प्रश्न संशोधकाने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना विचारला होता . त्या बाबत प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी दिलेली उत्तरे खाली दिली आहेत. (कंसात वारंवारिता )

1) क्षमता चाचण्या विषयी मार्गदर्शन करणे.(5)

2) निबंध, गृहपाठ व स्वाध्याय याविषयी मार्गदर्शन करणे.(7)

3) नवीन साहित्य निर्मितीसाठी मार्गदर्शन (4)

4) शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे व अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे.(3)

यावरुन असे स्पष्ट होते की शिक्षण विस्तार अधिकारी आपल्या बीटमधील शैक्षणिक कामे व गुणवत्ता विकासासाठीची

पुर्ण जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडतात.

महिन्यातून समूहातील शाळांसाठी कमीत कमी एक गटसंम्मेलन व्हावे. ज्यामध्ये शिक्षक आपल्या अडचणी व शंका विस्तार अधिकारी यांना विचारतील व विस्तार अधिकारी मार्गदर्शन करतील असे अपेक्षित आहे. गटसंम्मेलनात विस्तार अधिकाऱ्यांनी नमुना पाठ घ्यावेत त्याचबरोबर शिक्षकांच्या प्रशासकीय अडचणी जाणून घ्याव्यात, असे संशोधकांचे मत आहे.

संशोधकांने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना प्रशासकीय कामाविषयी प्रश्न केला होता. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून माहिती कोष्टक क्रमांक 5.75 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमाक 5.75**

**प्रशासकीय कामाचे स्वरुप**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | पेन्शन प्रकरणे | 05 | 71.43 |
| 02 | वसुलीची रक्कमेबाबत | 04 | 57.14 |
| 03 | शासकीय योजना | 06 | 85.77 |
| 04 | भाडे प्रकरण | 03 | 42.85 |
| 05 | भविष्यनिर्वाह निधीबाबत | 05 | 71.43 |
| 06 | दीर्घमुदतीच्या रजेबाबत | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.75 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षण विस्तार अधिकारी विविध प्रशासकीय कामे करतात. त्यांचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे.पेन्शन प्रकरणे हाताळणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 71.43% आहे. वसुलीची रक्कमेबाबत काम करणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 57.14% आहे. शासकीय योजनांची कामे हाताळणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 85.77% आहे. भाडेप्रकरण हाताळणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 42.85% आहे. भविष्यनिर्वाह निधीबाबत शिफारस करणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 71.43% आहे.

शिक्षकांच्या दीर्घमुदतीच्या रजेबाबत शिफारस करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100.00 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, शिक्षण विस्तार अधिकारी व शिक्षक यांना सांधणारा दुवा आहे. शैक्षणिक कामे पाहत असतानाच त्यांना प्रशासकीय कामेही पाहावी लागतात. त्यामुळे शिक्षण विस्तार अधिकारी हा प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनातील महत्वाचा घटक आहे.

आपण कोणाचे गोपनीय अभिलेख लिहीता ? असा प्रश्न संशोधकाने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना विचारला होता. प्रतिसादक विस्तार अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.76 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.76**

**गोपनीय अहवाला बाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | केंद्रप्रमुख | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.76 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळांच्या केंद्रप्रमुखांचे गोपनीय अहवाल लिहीणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 100.00 % आहे. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या केंद्रप्रमुखांनी लिहीलेल्या गोपनीय अभिलेखांचे पुनर्विलोकन करतात असे शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे मत आहे.

यावरुन असे स्पष्ट होता की केंद्रप्रमुखांचे गोपनीय अभिलोख लिहिणे व मुख्याध्यापक, शिक्षक यांचे केंद्रप्रमुखांनी लिहिलेल्या अभिलेखांचे पुनर्विलोकन करण्याचे अत्यंत महत्वाचे काम शिक्षण विस्तार अधिकारी करतात. गोपीनीय अहवाल लिहित असताना व पुनर्विलोकन करीत असताना संबंधित कर्मचाऱ्यांचे वस्तुनिष्ठ मुल्यमापनव्हावे असे संशोधकाचे मत आहे.

शालेय तपासणी व पर्यवेक्षण प्रत्येक शाळेची वर्षभरातून किती वेळा तपासणी करता? असा प्रश्न संशोधकांने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना विचारला होता. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.77 मध्ये दिली आहे.

**कोष्टक क्रमाक 5.77**

**शाळा तपासणीबाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | दोन वेळा | 02 | 28.57 |
| 02 | तीन वेळा | 04 | 57.43 |
| 03 | चार वेळा | 01 | 14.20 |
| | एकूण :- | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5. चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्राथमिक शाळेची एका वर्षातून दोन वेळा तपासणी करणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.57 % आहे. एका वर्षातून तीन वेळा तपासणी करणऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 57.43 % आहे. वर्षातुन चार वेळा शाळा तपासणी करणऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 14.10% आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, एका वर्षातून प्रत्येक शाळेची तपासणी करणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे. शिक्षण विस्तार अधिकारी ज्या बीटमध्ये काम करतात, त्या बीटमध्ये सरासरी 18 प्राथमिक शाळा आहेत. त्यामुळे शिक्षण विस्तार अधिकारी वर्षातुन प्रत्येक शाळेची तीनवेळा तपासणी करतात ही बाबसमाधानकारक आहे. प्रत्येक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी प्राथमिक शाळेची वर्षातून तीनवेळा तपासणी करावी असे, संशोधकांचे मत आहे.

शाळा तपासणी नंतर शिक्षकांची एकत्र बैठक घेता काय ? असा प्रश्न संशोधकाने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी विचारला होता. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.78 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक 5.78**

**शाळा तपासणीनंतर शिक्षकांची बैठक**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 06 | 85.77 |
| 02 | नाही | 01 | 14.23 |
| | एकूण | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.78 चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, शाळा तपासणीनंतर शिक्षकांची एकत्र बैठक घेणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 85.77 % आहे. शाळा तपासणीनंतर एकत्र बैठक न घेणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 14.23 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, शाळा तपासणीनंतर शिक्षकांची एकत्र बैठक घेणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. शाळा तपासणीनंतर शिक्षकांची एकत्र बैठक घेतल्यामुळे आपसात चर्चा करता येते. शिक्षकांच्या ज्या शैक्षणिक अडचणी असतील त्या चर्चेद्वारे सोडविता येतील त्याचप्रमाणे ज्या शिक्षकांचे अध्यापन कार्य चांगले आहे. त्यांना या बैठकीत शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना प्रोत्साहीत करता येईल. त्यासाटी शालेय तपासणीनंतर शिक्षकांची एकत्र बैठक घेणे आवश्यक आहे. जे शिक्षण विस्तार अधिकारी अशा बैठका घेत नसतील त्यांनी शाळा तपासणीनंतर शिक्षकांची बैठक घ्यावी, असे संशोधकांचे मत आहे.

शाळा तपासणीच्या वेळी दिलेल्या सूचनांची कार्यवाही होते. का ? असा प्रश्न संशोधकाने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना विचारला होता. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.79 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमाक 5.79**

**सूचनांच्या कार्यवाहीबाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 05 | 71.43 |
| 02 | नाही | 02 | 28.57 |
| | एकूण | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.79 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शाळा तपासणीच्या वेळी दिलेल्या सूचनांची कार्यवाही होते असे मत व्यक्त करणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 71.43 % आहे.शाळा तपासणी च्या वेळी दिलेल्या सूचनांची कार्यवाही होत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.57 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, शाळा तपासणीनंतर शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुचनांची कार्यवाही करणाऱ्या शाळांचे प्रमाण अधिक आहे. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांची कार्यवाही मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याकडून झाल्यास शाळेचा शैक्षणिक विकास होईल व शाळा प्रगतीपथावर जाईल. त्यासाठी जास्तीत जास्त शाळा सूचनांची कार्यवाही करतात ही बाब समाधानकारक आहे.ज्या शाळा सूचनांची कार्यवाही करीत नाही त्यांच्या विरुध्द प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी असे संशोधकाचे मत आहे.

शालेय अभिलेख तपासणीच्या वेळी कोणकोणते अभिलेख पाहता ? असा प्रश्न संशोधकाने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना विचारला होता. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.80 मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्रमाक 5.80**

**शालेय अभिलेख तपासणीबाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | प्रत्यक्ष पटपडताळणी (प्रवेश निर्गम रजिस्टर) | 04 | 57.14 |
| 02 | पगार वाटप रजिस्टर | 05 | 71.43 |
| 03 | विद्यार्थ्यांचे दैनंदिन उपस्थितीपट | 07 | 100.00 |
| 04 | परिपत्रक संचिका | 06 | 85.77 |
| 05 | सूचना वही | 03 | 42.85 |
| 06 | जमाखर्च , कॅशबुक, खतावणी रजिस्टर | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.80 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शालेय अभिलेख तपासणीच्यावेळी प्रवेश निर्गम रजिस्टर तपासनाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 57.14 % आहे. पगार वाटप रजिस्टर पाहणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 71.43 % आहे. विद्यार्थ्यांचे दैनंदिन उपस्धिकीपट पाहणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 100.00 % आहे. परिपत्रक संचिका पाहणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 85.77 % आहे. सुचना वही पाहणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 42.85 % आहे. जमाखर्च , कॅशबुक , व खतावणी रजिस्टर तपासणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 100.00 % आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांचे दैनंदिन उपस्थिती व जमाखर्च , कॅशबुक , खतावणी रजिस्टर तपासणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 100.00 % आहे. शाळेची दैनंदिन उपस्थिती व शाळेचा आर्थिक व्यवहार या बाबीवर, तपासणी केल्यामुळे योग्य ते नियंत्रण राहते. त्यामुळे शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची सर्व प्राथमिक शाळांच्या अभिलेखांची योग्य तऱ्हेने तपासणी करावी असे संशोधकांचे मत आहे. शिक्षण विस्तार अधिकारी आपल्या भेटीत शाळेतील महत्वाचे अभिलेख

तपासणी करतात, ही बाब समाधानकारक आहे.

शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी असल्यास आपणामार्फत होते काय ? असा प्रश्न संशोधकांने शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी विचारला होता. प्रतीसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक 5.81 मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमाक 5.81**

**खातेनिहाय चौकशी बाबत**

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 07 | 100.00 |
| 02 | नाही | 00 | 00.00 |
| | एकूण | 07 | 100.00 |

उपरोक्त कोष्टक क्रमांक 5.81 चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचारी यांची खाते निहाय चौकशी शिक्षण विस्तार अधिकाऱ्यामार्फत होते. असे मत व्यक्त करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 100.00% आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून शिक्षक, मुख्याध्याकपक व इतर कर्मचारी यांची चौकशी विस्तार अधिकाऱ्यामार्फत केली जाते. चौकशीनंतर अहवाल वरिष्ठांना पाठविला जातो. विस्तार अधिकाऱ्यांचा शिक्षक, मुख्साध्यापक व वरिष्ठांशी सतत संबंध येत असल्यामुळे विस्तार अधिकारी आलेली चौकशीची कामे व्यवस्थितपणे पार पाडू शकतो असे संशोधकांचे मत आहे.

**5.11 गटशिक्षण अधिकारी यांच्या मुलाखतीतुन मिळालेल्या माहितीचे विशदीकरण**

**प्रास्ताविक –**

संशोधकाने उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाचा प्रमुख या नात्याने गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती उस्मानाबाद यांची मुलाखत घेतली. मुलाखतीसाठी त्यांची पूर्व परवानगी घेऊन, वेळ ठरविण्यात आली. गटशिक्षण अधिकारी यांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

1) संशोधकाने सुरुवातीस गटशिक्षण अधिकारी यांना त्यांची वैयक्तिक माहिती विचारलेली होती. त्यांचे नाव व मुख्यालयाविषयी माहिती परिशिष्ट " ग " मध्ये देण्यात आलेली आहे.

गटशिक्षण अधिकारी यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता बी. ए. बी. एड्. अशी आहे. त्यांनी माध्यमिक शिक्षक म्हणुन पंधरा वर्ष काम पाहिले आहे.

सन 1997 पासुन गटशिक्षण अधिकारी पदाचे काम पाहत आहेत.

2) गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या मते, सर्व प्राथमिक शिक्षकांना वेळेवर वेतन वाढी दिल्या जातात.

3) गटशिक्षण अधिकारी म्हणुन, शिक्षक व कर्मचाऱ्यांची मासिक देयके शिक्षकांची भविष्यनिर्वाह निधी, पेंन्शन प्रकरणे, रजा प्रकरणे वेतन निश्चिती, शासनाच्या विविध योजना व सर्व प्राथमिक शाळांवर नियंत्रण ही महत्वाची प्रशासकीय कामे करावी लागतात, असे गटशिक्षण अधिकारी यांनी स्पष्ट केले.

4) उस्मानाबाद तालुक्यात विद्यार्थ्यांसाठी शासनाची पुस्तक वाटप योजना, उपस्थिती भत्ता योजना, लेखन साहित्य, गणवेश वाटप, सकस आहार, शैक्षणिक साहित्य वाटप योजना, राबविल्या जातात असे गटशिक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले.

5) गटशिक्षण अधिकाऱ्यांचे मते, प्राथमिक शाळांच्या भेटीच्या वेळी शाळेच्या शैक्षणिक बाबीबरोबरच केंद्रप्रमुख व केंद्रीयमुख्याध्यापकांचे आर्थिक व्यवहार तपासले जातात.

6) गटशिक्षण अधिकारी महिन्यातुन 22 शाळांना भेटी देतात असे सांगितले.

7) उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांची आदर्श शिक्षक निवडीसाठी व वेतन वाढीसाठी गटशिक्षण अधिकारी शिफारस करतात

असे सांगितले.

8) एखादा शिक्षक अनाधिकृतपणे अनुपस्थित राहिल्यास त्यायी माहिती वरिष्ठाकडे पाठविली जाते असे गटशिक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले.

9) प्राथमिक शाळांच्या मान्यतेचे प्रस्ताव गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे सादर केले जातात. त्याचबरोबर एस. एस. सी. बोर्ड (28.1) मान्यता प्रस्ताव गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फतच पाठविला जातो असे सांगितले.

10) गटशिक्षण अधिकाऱ्यांना, पंचायत समिती, शिक्षण समिती, शालेय पोषण आहार योजना, मुख्यकार्यकारी अधिकारी, केंद्रप्रमुख व केंद्रिय मुख्याध्यापक या सर्व बैठकांस उपस्थित रहावे लागते.

5.12 **प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण :-**

प्रास्ताविक :-

संशोधकाने संशोधनाच्या दृष्टीने जास्त माहिती मिळविण्यासाठी उस्मानाबाद तालुक्यातील दहा प्राथमिक शाळांना भेटी दिल्या. मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीत मिळालेली माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी या भेटीचा अत्यंत चांगला उपयोग झाला. प्रश्नावलीत ज्या गोष्टी संबंधित आहेत त्याच्या व्यतिरिक्त ही बऱ्याच गोष्टी भेटी व निरीक्षणातून मिळाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

क) **प्राथमिक शाळांच्या इमारती व इतर सोयी :-**

दहा प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटीतून संशोधकांच्या निदर्शनास खालील बाबी आल्या

1. 80 % प्राथमिक शाळांच्या इमारतीवर पत्रे आहेत. फक्त दोन (20% ) शाळांच्या इमारतीवर स्लॅब आहेत.
2. 80 % प्राथमिक शाळा गावात गजबजलेल्या परिसरात होत्या.
3. 50 % प्राथमिक शाळांना पुरेशा वर्ग खोल्या होत्या.
4. 80 % प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती.
5. 20 % प्राथमिक शाळा हवेशीर वातावरणात होत्या.

ख) **वर्ग खोल्यांच्या निरीक्षणातून माहिती :-**

1. 90 % प्राथमिक शाळेतील वर्ग खोल्यात वेळापत्रक लावले होते.
2. 80 % प्राथमिक शाळांमधुन अभ्यासक्रम नियोजन, घटक नियोजन व वार्षिक नियोजन केले जाते.
3. 50 % प्राथमिक शाळांच्या खोल्या स्वच्छ होत्या.
4. 30 % खोल्या हवेशीर चांगला सूर्यप्रकाश येणाऱ्या होत्या .
5) 80 % प्राथमिक शाळांच्या भिंती बोलक्या होत्या, तेथे तक्ते, नकाशे लावलेले होते.
6. 30 % प्राथमिक शाळांमधुन पुरेसे फर्निचर असल्याचे दिसून आले .

7. 80 % प्राथमिक शाळांचे मैदान नसल्याचे दिसून आले.

8. 80 % प्राथमिक शाळांना बाग बगीचे नसल्याचे दिसून आले.

9. 70 % प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त असलेली दिसून आली.

5.13 **समारोप** :–

मुख्याध्यापकांची प्रश्नावली , केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखती, प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व प्राथमिक शाळांची केलेली निरीक्षणे या द्वारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विशदीकरण प्रस्तुत प्रकरणात केलेले आहे. शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिसादामुळे मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद विश्वसनीय आहे. याची खात्री पटते. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष दिलेल्या भेटी व केलेल्या निरीक्षणातून मिळालेल्या प्रतिसादावरुन शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या सूचना योग्य वाटतात. या माहितीवर आधारितच पुढील प्रकरणांत संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी दिलेल्या आहेत.